डॉ. नितीन मोरे

आहे हे असं आहे!



आहे हे असं आहे!

नाटक

डॉ. नितीन मोरे

ई साहित्य प्रतिष्ठान

आहे हे असं आहे!

नाटक

लेखक:- **डॉ. नितीन मोरे,**

श्वसनरोग तज्ञ,
वसई, जि, पालघर.

Moblle No. 98209 37490, 98696 73415.

Emall - drnmore@yahoo.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

Th ls declarat lon ls as per the Copyr lght Act 1957. Copyr lght protect lon ln lnd la ls ava llable for any l lterary, dramat lc, mus lcal, sound record lng and art lst lc work. The Copyr lght Act 1957 prov ldes for reg lstrat lon of such works. Although an author's copyr lght ln a work ls recogn lsed even w lthout reg lstrat lon. lnfr lngement of copyr lght ent ltles the owner to remed les of lnjunct lon, damages and accounts.

प्रकाशक- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahlty.com

esahlty@gmall.com

Whatsapp- 9987737237

(फ़्री पुस्तकांसाठी नाव व गाव कळवा)

प्रकाशन :- २४ जानेवारी २०२६

©esahlty Pratlshthan®2026

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

डॉ. नितीन मोरे

डॉ. नितीन मोरे हे व्यवसायाने डॉक्टर असून वसई, मुंबई येथे श्वसनरोग तज्ञ म्हणून सुप्रसिद्ध आहेत. त्यांना मराठी व इतर भाषा विषयांची आवड असल्याने त्यातूनच लिखाणाची आवड निर्माण झाली. सामान्यत:- आजूबाजूच्या दैंनंदिन घटनांतील विसंगती व त्यातून निर्माण होणारा विनोद हा त्यांचा आवडता विषय आणि त्यातून उपरोधात्मक लिखाण आणि मर्मभेदी टिप्पणी करण्यात ते माहीर आहेत. त्याचबरोबर आजूबाजूच्या व्यक्तीमधले नेमकेपण हेरून त्यावरही ते हीतात. त्यांच्या लेखनाचा कॅनव्हास नवनवीन प्रयोगांतून कायम विस्तारत असतो. त्यात पत्रलेखन, विज्ञानकथा, कहाण्या, नाटके, एकांकिका, नाट्यछटा, प्रेमकथा हे सर्व असते.

नेहमी दिवाळी अंकातून डॉक्टरांच्या विनोदी कथा प्रकाशित होत असतात. ई साहित्यवर त्यांचे हे एकसष्टावे पुस्तक प्रकाशित होत आहे. त्यांचा स्वतःचा असा एक वाचकवर्ग आता निर्माण झाला असून तो त्यांच्या पुस्तकांची वाट पहात असतो.

Moblle No. 98209 37490, 98696 73415.

Emall - drnmore@yahoo.com

आहे हे असं आहे!

डॉ. नितीन मोरे

१.

(स्थान:

कृष्णा सदाशिव डांगेंचे कोकणातील घर. बाहेरील खोली, त्यात आराम खुर्ची एकीकडे, कॉट, टेबल. बाजूला स्वयंपाकघर. त्यातच एक श्री.सदाशिव डांगे यांचा हार घातलेला फोटो. बाजूला देव्हारा.)

(कृष्णा बाहेरून आत येत..)

धनंजय माने इथेच राहतात का? असणारच! उगाच बनवाबनवी नको!

काय!

थोडा उशीर झाला.. मैं देर करता नहीं देर हो जाती है!

काय करणार! लाईट गेले.. तो हमारे घर अंधेर है और देर भी!

मी कोण?

राहूल..? नाम तो सुना होगा.. सेनोरिटा!

नो! नाय! नेव्हर!

आयॅम अ डॉन.. के. एस. डॉन.. कृष्णा सदाशिव डॉन्गो! ऊर्फ डान..

डॉन!

(उडी मारत)

अरे दीवानों.. मुझे पहचानो.. कुठूनी आलो मी तर कोण? मैं हूं डॉन .. मैं हूं ड्रोन.. मी आहे द्रोण! ड्रोन नाही तर सकाळचं हेलिकॉप्टर पकडलं नि आता उतरलो एस्टी स्टँडावर.. च्या मारी.. हेलिकॉप्टर स्टँडला बघितलं तर ही लाईन

म्हटलं, अरे ओ सांबा.. कितने आदमी हैं?

सांबा कसला बोलतोय .. सांबार पीत बसलेला..

म्हटलं, जहां मैं खडा हूं वहींसे लाईन शुरू होती है.. टाॅक टाॅक करत हेली त चढलो.. लोकांना म्हटलं, आधे उधर जाव, आधे इधर जाव.. बाकी मेरे पीछे आव! लोकं पण कसले अर्धवट! आले माझ्या मागून!

हेलिकॉप्टर मध्ये जरा जास्तच गर्दी होती. काही खिडकीतून शिरले, काही थेट पंख्यावर जाऊन बसले. कंडक्टरचा पत्ता नाही.. म्हटलं येईल. नया होगा वह!

शेवटी एकदाचा तो आला! टिंग टिंग बेल मारून म्हणाला, आगे बढो!

म्हटलं.. दोन रत्नांग्री देना!

दोन! मी तर एकटाच दिसतोय!

कारण?

रस्त्यात रत्ना गिरी! बट नेव्हर माइंड!

रत्ना कोण?

सांगतो नंतर.

आधी तो कंडक्टर. विथ बॅड कंडक्ट!

छुट्टा निकालो म्हणाला. चालिस रूपया निकालो..

म्हटलं पैसा नहीं है.. नो मनी!

नहीं है?

नहीं बाबा. मराठीत कळत नाही? इंग्रजीत सांगू?

कंडक्टर म्हणे, कोणतीही भाषा में सांगो..

म्हटलं, वेअर! म्हणजे होते.. पण चाळीस रूपये वारले!

मग शंभराची नोट दिली..

तर म्हणाला, जिसने हमें नोट दी छुट्टा भी वही देगा!

मी म्हटलं, अरे बाबा! तुम्हारा हमारा कुछ पीछले जिंदगी का दुष्मनी है क्या? नै ना? मग तुमही देना छुट्टा! हाथमें. क्योंकि आज भी मैं फेके हुए पैसे नहीं उठाता!

तर पैसे देत म्हणाला,. उठा ले रे बाबा!

म्हणणार होतो, कुठे त्या आकाशातल्या देवाच्या कानी पडलं तर खरंच उठा लेगा तुमको! पण जाऊ दे म्हटलं, बडे बडे देशोंमें ऐसी छोटी छोटी बाते होते रहती है! जाने भी दो यारों! नया है वह!

तर, त्या हेलिकॉप्टरला ही गर्दी.

पंखा होता म्हणून बरं, उकडत नव्हतं. तरी पाचावर फिरत होता म्हणून पाचावर धारण बसलीच!

हेलिकॉप्टर एस्टीस्टँडावर उतरले नि लोक उतरले. मी परत म्हटलं, आधे उधर आधे इधर और बाकी मेरे पीछू आव! आधे अधुरे अर्धवट लोक! परत माझ्यामागे आलेच!

तर ती रत्ना!

रत्ना म्हणजे?

हे पण सांगायला हवे?

मेरे दिल की धडकन.. माझी हृदय स्वामिनी. हृदयचंद्रिका.. हृदय कणिका.. नव्हे कर्णिका..

थोडक्यात रत्ना म्हणजे माझा होणारा बायको! तिला घेऊन घरी येणार होतो भेटायला. तिला मी

म्हटलं, शायद मेरे शादी का खयाल दिलमें आया है.. म्हणूनच मम्मी ने तुम्हें चायपे बुलाया है! अर्थात टाटा टी का तुफान..

तर एस्टी स्टँडावरून एक टमटमीत टमटम केली नि निघालो.. मी आणि रत्ना. मी म्हणालो, प्यार की गाडी तेज चलाओ! ॲक्सिलरेटर

और दबाओ! तर काय? तुफान वेगात रस्त्यात टमाटे घेऊन गाडी येत होती. आमची टमटम त्या टळटळीत दुपारी तिला टक्करली.

डॅम इट!

फिर क्या हुवा?

फिर?

रत्ना गिरी रे.. बरेली के बाजार में.. तिच्या वर टमाटे.. तिला पाहून म्हणालो मी,

लाल लाल गाल उसपर टमाटर लाल लाल.. ओ तेरा क्या कहना..

बुझी को राख जली को आग कहते हैं.. टोमॅटोमें रत्ना गिरी उसे बाग कहते है..

तर ती म्हणाली, बाग? जरा नीट वाग!

म्हटलं तीच तू, जिसे देखकर दिल बाग बाग हो गया!

म्हटलं सॉसर मध्ये टमाटे पडले असते तर सॉस बनवला असता..

तर ती चिडली, कृष्णा, तुला परत विनोद सुचतोय? सॉस सॉसर आणि सासू? अशा अवतारात सासूला कशी भासू.. नव्हे भेटू?

रडायलाच लागली ती..

मी म्हटले, रत्ना आय हेट टायर्स.. टायर्स घसरले नि हा ॲक्सिडंट झाला.. ना उसने सिग्नल देखा ना इसने सिग्नल देखा.. ॲक्सिडंट हो

गया रब्बा रब्बा.. ते जाऊ दे.. आईस्क्रीम खाओगी.. पास मेरे आओगी..

तर तिने अजून भोकाड पसरले..

मी म्हटलं, रत्ना आय हेट टियर्स.. कपडे बदलून.. बाई वाड्यावर या..

ती म्हणाली, ओके. हाॅर्न प्लीज! थ्यांक्यू!

म्हटलं, दोस्ती का उसूल है, नो प्लीज नो थ्यांक्यू! आणि लवकर ये.. आ सिमरन जीने अपनी जिंदगी!

मग तिला सोडून मी पुढे निघालो.

कारण..

मेरे पास माँ है.. आणि वो वाट बघ रही है यहांपर..

(कृष्णा इकडे तिकडे शोधत..)

अरे.. माझा बोका दिसत नाही.. म्यांव!

व्हेअरार्यु?

तर..

मेरे पास मां के साथ म्यांव भी है!

तुम्हाला माहित नसेल, माझ्या बोक्याचे नावच डॉन आहे! डॉन्गेंचा पाळीव डॉन! इतका धावतो, इतका धावतो, पकडणं कठीण! खरंतर

डॉन को पकडना मुश्किलही नहीं, नामुमकिन है! एकदा डॉन धावत सुटला.. कुठल्या मांजरीबरोबर डेट असावी. 'तू छतपर आजा गोरिए' म्हणत छतावर चढला. तिकडून ती पांढरी शुभ्र मांजर. डॉन तिला पाहून म्हणाला ही.. मोगँबो खुश हुवा! डॉनच्या चेहऱ्यावर प्रसन्नता होती. सिलसिलातील अमिताभने रेखाला पाहिल्यावर त्याच्या चेहऱ्यावर दिसावी इतकी! डॉन कदाचित गाणारच असावा .. देखो वो आ गई.. वो आ गई.. मोनिका ss ओ माय डार्लिंग!

जाऊ देत!

यांना एकटे सोडावे हे बरे! प्रेमी जीवांत कबाब में हड्डी बनणाऱ्यांना पुढचा जन्म बिनहड्डीच्या सापसुरळीचा मिळतो म्हणे!

माझ्यासाठी इट्स ओके.. पण रत्ना? नेक्स्ट जन्मात ती सापसुरळीण नाही झाली तर? हमारा सात जनमोंका यह साथ बिछड जाएगा?

नहीं.. ये नहीं हो सकता!

दुनिया की कोई भी ताकत हमें जुदा नहीं कर सकती! आणि असं झालं तर मुझे खुदा भी नहीं बचा सकता!

तो फिर मुझे दवा नहीं दुवा की जरूरत पडेंगी?

देव ओन्ली नोज!

(इकडे तिकडे शोधत)

पण मां?

मां किधर है?

कहीं वह अभागन दर दर की ठोकरें तो नहीं खा रही?

माँ तू किधर है?

जरूर मंदिर गई होगी.. मन्नत मांगने. बीए का एक्झाम था मेरा..

बीए?

नहीं एम..बीए.. नको.. एम बी बी एस!

हे चांगले वाटते!

परीक्षा.. मग नोकरी.. मग छोकरी..

मी सांगेन.. मां मैं पास हो गया मां..

मां म्हणेल.. काश तुम्हारे पिताजी आज यह दिन देखने जिंदा होते!

(आत जातो, वडलांच्या तसबिरीसमोर उभा राहात)

मग आम्ही त्या पिताजींच्या तसबिरीपुढे उभे राहू..

मग मी सांगेन, देखो मां! तुम्हें मिलाने मैं किसे लाया हूं.. रत्ना..

(परत बाहेर येत..)

पण माझी रत्ना.. कुठेय?

आली कशी नाही?

अजून आली कशी नाही माझी प्रिया..

प्रिय प्रेयस प्रेयसी..

वाट पाहून माझ्या डोळ्यांच्या खाचा झाल्या, मेंदूचा भुगा झाला, कालवाकालव झाली हृदयात, यकृतात आणि किडनीतही.

आणि माझी प्लिहा.. ती कशी मागे राहिल? तिच्यातही कुछ कुछ होता है..

रत्ना.. अनमोल रतना..

तू छुपी है कहां.. मैं तडपता यहां..

जाने जां.. ढुंढता फिर यहां..

ये लवकरी.. झडकरी..

रत्ना तू ये ना..

(थोडा थांबून)

- नहीं तो दुगुना लगान देना पडेगा..

(रत्ना स्वप्नात यावी तशी स्लो मोशन मध्ये धावत आत येते..

तिला पाहून)

कृष्णा: आली.. दुगुना लगान म्हटले तर लगेच आली! पक्की कोंकणी ती! माझी प्राणकलिका. माझी प्राणज्योती. माझी लाईफलाईन..

मी अमिताभ तू रेखा..

मी सचिन तू अंजली..

मी वीरू तू बसंती..

मी धर्मेंद्र तू हेमा.. हे मां!

(ती हळू हळू धावत पुढे येते. तो हळू हळू तिच्याकडे धावत..)

कृष्णा: ये कहां आ गए हम.. यूंही फास्ट भागते भागते..

(दोघे समोरासमोर उभे.)

कृष्णा: शहजादी आ गई? रास्तेमें कोई तकलीफ तो नहीं हुई अनारकली?

रत्ना: नहीं सलीम. तुम्हें मिलने जिया बेकरार है.. आई बहार है.. दुनियाकी निगाहोंसे बचकर आई. मैं तुझसे मिलने आई मंदिर जाने के बहाने.. लेकिन कहीं शहनशाह अकबरने देख लिया तो?

कृष्णा: तो? इधर कोई दीवार बन नहीं सकती जिसमें तुम्हें वह अंदर गाड देंगे.. अनारकली, इस कोकण किनारेपर दीवार बनाने के लिए एन्व्हा◌ॅयरमेंट मिनिस्ट्री परमिशन नहीं देगी. और देगी तो भी हम लोग आंदोलन करेंगे! गो बॅक भिंतीवाल्यांनो! भिंतीची कसली भीती? पर अनारकली, प्यार किया तो डरना क्या? घुंट घुंट के अब मरना क्या!

रत्ना: सलीम! इस नाचीज का क्या! जिस पैरोंमें बांधो, घुंगरुओं जैसी नाचेगी नाचीज..

कृष्णा: चीज? नहीं तू है बटर! ना चीज? नहीं अनारकली रत्ना.. तू चीज बडी है मस्त मस्त, तू चीज बडी है मस्त..

रत्ना: चलो हटो.. तुम भी ना बडे वो हो..

(पुढे जाते नि मग मागे वळून पाहते..)

कृष्णा: मुड मुड के न देख मुड मुड के..

रत्ना: सलीम..

कृष्णा: बोलो अनारकली.. तू माझी जूलिएट..

रत्ना: मेरे रोड रोमिओ.. नहीं नुसताच रोमिओ..

कृष्णा: तू हीर..

रत्ना: तू रांझा

कृष्णा: तू सोहनी

रत्ना: तू महिवाल

कृष्णा: तू शिरी

रत्ना: तू ॲलेक्सा..

कृष्णा: काय? शिरशिरी आली एकदम!

रत्ना: सॉरी रे! तू फरहाद..

कृष्णा: मी जय

रत्ना: मी राधा

कृष्णा: मी वीरू

रत्ना: मी बसंती..

कृष्णा: यस्स.. तूच माझी पहिली पसंती! मी वासू..

रत्ना: मी सपना..

कृष्णा: हाय! यह सपना कब होगा अपना? मेरे सपनोंकी रानी कब आएगी तू.. आई ऋत मस्तानी कब आएगी तू..

रत्ना: मी ऑलरेडी आलेय राजा.. मी आले.. निघाले.. मी जिंकून घेतलं सारे ..

कृष्णा: हाय! नकोत जीवघेण्या अदा.. ज्यावर मी फिदा!

(कृष्णा पाठीमागे बघत..)

कृष्णा: बापरे! मेलो! ते बघ! शाकाल!

रत्ना: तू माझ्या बाबांना शाकाल म्हणतोस.. अप्पा.. शाकालप्पा?

कृष्णा: नुसतेच अप्पा नव्हेत.. बंदूकधारी अप्पा आहेत! गप्पा मारायला नाही आलेत.. आपण टप्प्यात आलो की.. (बोटांनी बंदुकीची ॲक्शन करत) ढिश्यांव! चल.. लेट्स् गिव्ह द टायटॅनिक पोझ डार्लिंग..

(दोघे टायटॅनिक पोझ मध्ये उभे राहतात)

रत्ना: माझ्या प्राणप्रिया.. त्यांच्या बंदुकीची गोळी आधी माझ्या हृदयाच्या चौथ्या कप्प्यातून जाईल.. तुला माहित नसेल तर सांगते. हृदयाला चार मजले असतात. एकावर एक. चौथा मजला म्हणजे चौथा कप्पा..

कृष्णा: वॉव! शाकाल इज ऑलिंपिक नेमबाज? परफेक्ट चवथा मजला! मजला नाही विश्वास!

रत्ना: नहीं सलीम! तुम नहीं जानते.. उडते कबुतरोंकी शिकार के शौकीन.. हालांकि यह बंदूक कभी कभी उलटी चलती है! तरीही व्हाय टेक अ चान्स? मी तुझ्या पुढे.. लोगों न मारो इसे.. यही तो मेरा दिलदार है! हुस्न हाजिर है मोहब्बतकी सजा पाने को.. कोई पत्थर से न मारे मेरे दीवाने को..

कृष्णा: नो पत्थर डार्लिंग.. इट्स अ बुलेट. उद्याची हेडलाईन. बुल बुलेट बुलेटीन! (बातम्या वाचल्याच्या टोन मध्ये) ब्रेकिंग न्यूज.. हियर इन रत्नागिरी अ बुल अटॅक्स विथ अ बुलेट.. देअर आर रिपोर्टस दॅट द बुल केम चार्जिंग ॲट अ लव्हली लव्हर कपल ॲंड फायर्ड द बुलेट व्हिच पास्ड थ्रू द गर्ल्स हार्ट, देन द लव्हर बा ॅयज हार्ट.. द बुल देन कलेक्टेड द बुलेट बॅक फा ॅर रियुझ! दॅट्स द एंड ऑफ द बुलेटीन!

रत्ना: बुल? मेरे अप्पांको बुल बुलाता है तू?

कृष्णा: नहीं मेरी बुलबुल.. ते असंच.. पण माझे हृदयस्वामिनी.. मी असताना कसली चिंता.. तामिळ तेलगू मल्याळम सिनेमांची शपथ.. त्या बंदुकीच्या गोळीला मी धोनीसारखा डाइव्ह मारुन कॅच करेन.. विकेटकीपर बनून.. ती गोळी लोळागोळा होईल..

रत्ना: अय्या! हाऊ रोमँटिक..

(परत स्वप्नातल्यासारखी जायला निघते..)

रत्ना: माय धोनी.. नाऊ कॅच मी इफ यू कॅन.. पकडो मुझे अगर पकड सके तो.. मी साक्षी आहे..

(ती निघून जाते.)

कृष्णा: गेलीस? हाय!

फँटसी.. माझी प्रेयसी!

तुला न ठाऊक किती विदीर्ण करून गेलीस माझे हे पाच कप्प्यांचे हृदय.. तुझ्यासाठी खास बनवून घेतलेला पाचवा कप्पा. त्यात येऊन सामावलेली तू.. त्या कप्प्यालाच पडलेले हे दु:स्वप्न.. हे काय?

माझ्या हृदयठोक्यांत अनियमितता? धाडधाड धडधड धडधड.. हे हृदय धड चालेल तर.. नि हे काय? अचानक बंद..?

(एकाएकी खाली पडतो. थोड्या वेळाने उठतो.. आजूबाजूला पाहात..)

मैं कहां हूं?

ओम फट स्वाहा!

आय टेल यू.. ऑल इज वेल आणि ऑल विल्बी वेल!

च्यायला! दुनिया की कोई भी दीवार हमें जुदा नहीं कर सकती!

जालिम जमाना हमें मिलने नहीं देगा..

(हातात एक मलमाची ट्यूब खिशातून काढत जाहिरातीसारखी दाखवत)

पण जालिम लोशन हमें जुदा नहीं होने देगा!

दाद खाज खुजलीका दुश्मन जालिम लोशन! च्यायला!

नाटकातल्या स्वगतातही जाहिरात?

हम सब जाहिरातीसे घिरे हुए हैं..

पृथ्वीवर ऐंशी टक्के पाणी आहे तसं आपलं जीवन!

ऐंशी टक्के जाहिरातींनी व्यापलेलं आहे!

ॲड्स ॲड लाईफ टू अवर लाईफ!

हे काय? भरकटतोय का मी?

पण क्या करू?

टेन्शनच इतकं आहे!

बाकी टेन्शनचे काय? टेन्शन लेनेका नहीं तो देनेका! क्या?

त्रास करून घ्यायचा नाही, द्यायचा!

तर वुई विल्बी राईट बॅक.

आहे हे असं आहे!

कुठेही जाऊ नका.

रिमोटवरील बटण दाबू नका.

आम्ही परत येतोय.

कारण..

पिक्चर अभी बाकी है मेरे दोस्त!

शेवटी काय, तुम्हाला सांगतो..

शाकाल ऑर नो शाकाल..

लाईफ मध्ये लव्ह नावाचा टाइमपास पाहिजे! पाहिजेच!

थकलो रे नंदलाळा.. वाट पाहून..

थोडी निद्रादेवीची आराधना करावी हे बरं..

(जप म्हटल्याच्या सुरात..)

ओम नेत्र मिटून निद्रां देवी..

ओम नेत्र मिटून निद्रां देवी..

बाजूच्या खुर्चीवर बसतो. डोळे उघडे ठेवून झोपतो. मंद घोरण्याचा आवाज येत राहतो.

२.

(रत्ना आत शिरते. कृष्णा आरामखुर्चीवर तंद्रीत बसून आहे. डोळे उघडे, पण झोपलेला.)

रत्ना: ओ मेरे राजकुमार! तेरे बिन रहा न जाय..

झोपलाय वाटतं!

उघड्या डोळ्यांनी?

बेडकासारखा! झोपतो डोळे उघडे ठेऊन!

बेडकासारखे डोळे? माझा मंडुकनयन!

असाच आहे तो!

पण काही असो, वो मेरा है. यार है दिलदार है.. स्टार यार कलाकार है! त्याच्यापुढे ही दुनिया सारी इराण है.. इराण नाही विराण है! तू नहीं तो सबकुछ वीराना है..

(हात हलवत बांगड्यांचा किणकिण आवाज कृष्णाच्या कानाजवळ करते .. तो उठत नाही..)

चुडी दगा देगी कंगन दगा भी देगा..

तेरे बगैर साजन बैंगन भी दगा देगा!

बैंगन?

लव्हस्टोरीत वांगी? का नाही?

आमच्या शतकानुशतकात घडू पाहणाऱ्या अमर प्रेमकथेचे वांग्याचे भरीत बनवू पाहणारे सारे.. माझ्या अप्पांना ठाऊक झाले तर? सगळे हिंदी सिनेमातील पोरीचे पिताजी अशावेळी करतात तेच करतील!

खोलीत बंद?

अप्पा!

अप्पाच माझे आई नि वडील. आई नाही मला वाचवायला. अप्पांचा जमदग्नी ब्रँड राग ठाऊक आहे सगळ्यांना. म्हणतील,

आजसे इसका बाहर जाना बंद! बहुत हो गया लाड प्यार!

हे बाकी मस्त!

कॉलेजला जायला नको!

आता हा बेडूकनयन भेटल्यावर कॉलेजला जायची गरजच काय?

खरं सांगू, दहावी बारावीत हेच टेन्शन! चांगलं कॉलेज नाही मिळालं तर मला माझा चांगला शाहरूख मिळणार कसा? पण कुठेना कुठे आपला जोडीदार असतोच जगात नि वेळ आली की मिळतोच म्हणतात! तसा हा मिळाला.

यहीच तो मेरा दिलदार है..

आणि एक मज्जा!

विचार करा.. झाडावर चढून कृष्णा खिडकीतून माझ्या खोलीत गुपचुप शिरलाय..

अप्पा येतात नि हा असा माझ्या कॉट खाली लपेल..

अप्पा धाडकन दरवाजा बंद करून घेतील..

मग काय?

हम तुम एक कमरेमें बंद हो!

किती रोमँटिक!

आगे कोई डाकू लुटेरा? अप्पा नि डाकू? यस्स. आमच्या प्रेमकथेवर डाका डालणारे! बंदुकधारी डाकू! डाकू अप्पासिंग!

मग घराने की इज्जत वगैरे..

ही इज्जतपण ना अशी असते!

बंदुकीच्या गोळ्यांनी कुणाला मारले तर इज्जत वाचते पण जिवंत राहून? नाही वाचवता येत ती! मी म्हणेन पाया पडत, अप्पा मुझे इज्जतसे इजाजत दीजिए. ते मग पाय मागे घेतील. तू मला मेलीस आणि आम्ही तुम्हाला मेलो म्हणतील.. दाटून कंठबिंठ काही येणार नाही!

छे!

इतका सीरियस टर्न? नकोच!

मला ना असं गंभीर काही आवडत नाही. जिंदगी हँसने हँसाने के लिए है पल.. दो पल.

(कृष्णा उठतो.. डोळे उघडे तरी झोपेत चालल्यासारखा चालतो..)

रत्ना: बघितलंत? माझ्या प्राणनाथाला पाहिलंत?

माझा मंडुक! झोपेत चालतोय!

येताना ती टमटम काय उलटली. टमाटरही टमाटर सब जगह. टकमका मी पाहत होते. सासूला भेटायला निघालेले मी. नशीब टोमॅटो कलरचाच ड्रेस घालून. आता टोमॅटो पडले त्यावर तरी डाग दिसायचे नाहीत! पण हा मला सोडून पुढे निघून आला. म्हणाला अशी सरळ चालत रहा. मग लेफ्टला वळ म्हणजे राइट जागी पोहोचशील! हे काहीच नाही, मला म्हणाला तिकडे एक काळा कुत्रा बसलेला दिसेल. ते वळण नाही घ्यायचं! जणू त्या कुत्र्याचा हा पर्मनंट पत्ता आहे! नि महणे आघारकरांचा वाडा विचार. कुणीही सांगेल! शोधण्यात वेळ गेला माझा. नि हा? सासूबाई वाट पाहतील म्हणून आला पुढे. म्हणजे माझ्या सासूबाई.. भावी! मानभावी नव्हे.. भावी! आणि

मी आले तर हा खुर्चीवर झोपलाय! झोपतोयस कसला?

नींद उड जाए तेरी चैनसे सोनेवाले!

नको. झोपू देत!

मैं जिंदगीभर राह देखूंगी. सातों जनम में तेरे साथ रहूंगी यार.. मर भी गई तो तुझे करती रहूंगी प्यार! पोस्टमॉर्टेम प्यार! भुताटकी की काय?

काही वर्षांपूर्वी विचारलं असतं तर म्हणाले असते, दिलविल प्यारव्यार मैं क्या जानूं रे..

आता म्हणेन माझ्या बेडकाला, जानूं तो जानूं मेरे जानू.. तुझे अपना मानू रे!

हा बेडूक बघा कसा उड्या मारतोय.. नाही फिरतोय.

दिवसाढवळ्या झोप नि झोपेत चालतोय! चल चला चल, फकिरा चल चला चल! सुनके तेरी पुकार.. मुझको आया बुखार ..

बुखार?

मुझे वो वो वो तो नहीं हो गया?

आलुबुखार? नाही आला बुखार! यस्स! प्यार का ज्वर!

(कृष्णा परत खुर्चीत येऊन झोपतो, डोळे उघडून.)

रत्ना: माझ्या माकडा.. बेडका.. प्राणनाथ..

की प्रेम चोप्रा?

छे!

प्राण नाही नि प्रेम चोप्रा तर नाहीच नाही!

तू माझा अमित नि तूच माझा शाहरूख! पण नाही.. आयॅम जेन झी! तूच माझा रणवीर नि तूच माझा टायगर! जिसे देखकर कुछ कुछ होता है..

कॉलेजात याला पहिल्यांदा पाहिले तेव्हा.. बॅडमिंटन खेळत होते मी. संध्याकाळची वेळ. ढल गया दिन हो गई शाम म्हणत जायला निघाले! तितक्यात मला माझा श्वास दिसला.

श्वास कधी दिसतो का? अर्थात दिसतो!

(कृष्णाकडे बोट दाखवत) मूर्तिमंत श्वास समोर असताना हाथ कंगनी को आरसी कायकू? होणार मी त्याची नंबर वन बायकू! नंबर वन म्हणजे कृष्णाच्या एकहजार आठ पैकी नाही.

तो कृष्णा मी राधा..

तो मोहन मी त्याची माया!

बन्सीधराची राधिका.. कृष्णहृदयाची मालिका.. नाही मल्लिका!

तू माझा श्वास मी तुझा उच्छवास!

तू माझ्या हृदयाची धडधड.

तू माझ्या मेंदूतील सिग्नल!

मी? लिव्हरमधली काहीतरी? की किडनीतली?

पण काही होवो, दुनिया की कोई ताकत हमें जुदा नहीं कर सकती!

आता याची आई आली की तिचे सूनमुख पाहण्याचे स्वप्न पूर्ण होईल.

एकबार पोता खेळेगा मांडीपर तो सुखसे डोळा मिट सकूंगी म्हणतील त्या!

मला कसं माहिती?

अर्थातच, दुसरं काही बोलायला अलाऊडच नाहीये. सासूने असंच बोलायला नको?

आणि सासूत्व जपायचे तर त्यांनी आतापासून रिमा लागूंचे सिनेमे बघायला हवेत! ललिता पवारांचे नकोत! उगाच नसतं टेन्शन मला!

जमाना जुना असता तर आमच्या हाती सारं सोडून काशी यात्रेस गेल्या असत्या. आताही जातील पण विमानाने जाऊन येऊन काय यात्रा होते?

टू डेज थ्री नाईटस् यात्रा पॅकेज? राजाराणी ट्रॅवल्स!

त्यात मग इकडे राजा राणीला कसला मिळेल एकांत?

आणि तो नातू किंवा नात हवी मांडी ओली करायला तर..

अय्या, मुझे शरम आ रही है.. लाज से मेरे फेंट लाल गाल टोमॅटो जैसे डार्क लाल हो रहे हैं. शरमा लेती हूं थोडा फार! जमेगा इतना!

ह्याला काही आहे का बघा? घरी बोलावून स्वत: ढाराढूर! झोपलाय पहा कसा!

निरागस, राजबिंडा बेडूक माझा!

ही इज माय फेव्हरीट.

आणि खरं सांगायचं तर मी सुद्धा आहे माझीच फेव्हरीट! मेरी फेव्हरीट मैं ही हूं!

मंद मंद श्वास सुरू.. तुम्हारी सांसोंकी आवाज..

कृष्णाच्या मंद श्वासांनी बाजेल पावा.. गोकुळी आनंदे उडेल रावा!

पण सारे होईल ना नीट?

माझ्या नशिबाला लावीन तीट!

अप्पांसमोर माझा बेडूक असेल ना धीट?

पण काही होवो मी एकदा ठरवले ना की मैं खुद की भी नहीं सुनती!

सोन्या, उठ की रे!

उघड्या डोळ्यांनी झोप जास्तच गाढ लागते की काय?

इकडे मीच बोलतेय एकटी..

अर्थात वो तो होना ही था!

तू जागा असलास तरीही बोलणार मात्र मीच!

(कृष्णा स्वप्नातल्यासारखा उठून घोड्यावरून आल्यासारखा पण स्लो मोशन मध्ये येतो..)

(रत्ना त्याच्याकडे पाहात धावते.. देखो वो आ गया, वो आ गया म्हणत..)

रत्ना: बडा इंतजार करवाया आपने. हम सपने देखकर थक गये. लेकिन देर आए दुरूस्त आए..

कृष्णा: (घोड्यावरून उतरत) होय. तंदुरूस्त! मी तंदुरूस्त आहे! माझे हे बूट दुरूस्त करून आणले..

रत्ना: असोत! दिल और दिमाग नादुरूस्त न हो तो सब ठीक मेरे सपनोंके राजा! मेरे ख्वाबोंमें तू आए.. आकर मुझे छेड जाए.. चांगलं झालं मेरे सामने भी आए तुम! वाट पाहून तेरे डोळेकी खाचाएं हुई थी.. तो मेरेको क्या दिव्य दृष्टी मिली? बडी देर की मेहरबां आते आते!

कृष्णा: अगं, मैं देर करता नहीं देर हो जाती है. मी निघालो लवकर. रास्तेमें मेरे गाडी का ॲक्सिडंट हो गया..

रत्ना: डोन्ट टेल्मी.. वहीं टमाटर की गाडी से टकराए तुम? पण नाही! तुझ्या शर्टावर टोमॅटोचे डाग नाहीत. पिवळ्या शर्टावर.. म्हणजे.. हळदीचा ट्रक की काय? सोनु.. डोंट टेल मी.. तू हळद लावून आधीच तय्यार आहेस.. वॉव! बघू, गुडघ्याला बाशिंग आहे का?

कृष्णा: तू अर्ध्या हळकुंडाने पिवळी होतेयस राणी. तो ॲक्सिडंट तुझ्याशीच धडकल्याने.. मी इकडून तू तिकडून .. असे येतोय..

रत्ना: असं रे काय? मी इकडून.. तू तिकडून ..

कृष्णा: तेच ते!

रत्ना: नो! डेव्हिल इज इन डिटेल्स!

कृष्णा: बरं राणी.. तू म्हणशील तिकडून तू आणि तू म्हणशील तिकडून मी.. येतोय. मग एकमेकांवर धडकलो आपण..

रत्ना: न तूने सिग्नल देखा.. न मैंने सिग्नल देखा..

दोघे: ॲक्सिडेंट हो गया रब्बा रब्बा..

कृष्णा: म्हणून मला उशीर झाला माझ्या मनकर्णिके, हृदय जवनिके, मेंदू शासिके.. चाफेकळी नासिके..

रत्ना: मग लागलं तुला कुठे माझ्या जिवलगा?

कृष्णा: लगा.. जीव को जीव लगा.. रानी.. म्हणूनच तर जिवलगा म्हणतात!

रत्ना: बरं झालं तू आलास. यह बेदर्द, बेरहम, बेरड बेरकी, बे.. अजून काहीतरी जमाना मुझे ताने मार रहा था..

कृष्णा: जमाने का क्या? पण वरी नाॅट प्रिये.. हारकर बाजी जीतने वाले को ही बाजीराव कहते है!

रत्ना: नो डियर, बाजीगर कहते हैं..

कृष्णा: असेल. जली को आग, बुझी को राख कहते हैं.. हम वो हैं जानी जिसे पेडोंकी शाख कहते हैं..

रत्ना: और मैं फूल!

कृष्णा: गुलाब का! मेरी गुलाबी गुलाबो!

मैं इस मेहनत का फल!

रत्ना: फल मतलब टमाटर?

कृष्णा: तर ॲक्सिडंट हो गया आणि मैं लेट हो गया. डोळ्याला भिडले डोळे तर अपघात होणारच. उगाच नाही लिहित, हाॅर्न ओके प्लीज आणि नजर हटी दुर्घटना घटी!

रत्ना: गलत! सरासर गलत! नजर हटी नहीं राजकुमार! नैन लड गए हैं तो कसक होईबे करी..

कृष्णा: ओह! म्हणजे झाला तो रोड ॲक्सिडेंट नव्हता, गोड ॲक्सिडंट होता!

रत्ना: यस्स! गोड ॲक्सिडंट! तुम मैं और यह हसीं वादियां..

कृष्णा: वादियां? या कोकणात कुठे वादियां. अगं ही आघारकर वाडी आहे!

रत्ना: चालेल, ये हसीन वाडियाँ म्हणूयात.. तुम और मैं और ये समां..

कृष्णा: थांब. समेवर येण्याआधी.. माझा घोडा पार्क केलाय.. त्यात पेट्रोल भरायला लागेल!

रत्ना: घोड्यात पेट्रोल?

कृष्णा: तोबरा! तो बरा इंधनाशिवाय चालेल प्रिये!

(काल्पनिक घोड्यावर चढत पुढे जातो.. परत येऊन खुर्चीत येऊन डोळे उघडे ठेऊन झोपतो.)

रत्ना: आहे हे असं आहे म्हणजे!

हाय! मेरा सुंदर सपना बीत गया!

आता मैं और मेरी तनहाई.

हम बाते करेंगे..

तुम होते मैं यूं कहती..

तुम होते तो मैं यूं यूं कहती..

तुम होते तो मैं तुम्हें ये सुनाती..

तुम होते तो तुम्हें वो सुनाती..

तुम होते तो मेरी बातें गुपचुप सुनते..

मी बोलेन. बोलत राहिन.

तू ऐकशील. ऐकत राहशील.

राजा, कधी रे उठशील तू.

जिवलगा..

पण हा उठत नाहीये. जो घोड्यावरून आला तो स्वप्नातला

राजकुमार. हा माझा खराखुरा बेडूक..

आता पुढे काय?

सासूबाई येत नाहीत.. अप्पाच मागोमाग यायचे बंदूक घेऊन.. त्यापेक्षा बाहेर जाऊन वाट पहावी!

ह्याला ही कुंभकर्ण ब्रँड झोप आताच यावी?

याची पहा मुद्रा .. एन्जा ॅय करतोय निद्रा!

कर!

तर आहे हे असं आहे!

बेडका!

जेथे सागरा धरणी मिळते त्या किनाऱ्यावर तुझी मी वाट पाहते..

सागरतीरी भेट..

सागरकिनारे.. दिल ये पुकारे..

नाहीच आलास तर परतते हो रे!

(रत्ना निघून जाते. खुर्चीवर कृष्णा झोपला आहे..)

३.

(रत्ना बाहेर गेलेली आहे, कृष्णा झोपलेला आहे खुर्चीत. कृष्णाची आई भागिरथी आत येते. कृष्णा एका बाजूला खुर्चीवर आहे त्याच्याकडे लक्ष जात नाही. ती थेट आत स्वयंपाकघरात शिरते. समोर श्री. डांगेंचा फोटो, हार घातलेला. देव्हारा नि बाकी स्वयंपाकघर.)

भागिरथी: अजून आला नाही? कृष्णा येणार म्हणून धावत धावत आले. मेरे करण अर्जुन आएंगे.. करण अर्जुन नव्हे.. मेरा कृष्णा आएगा.. आज वह बडी परीक्षा पास होगा. मोठी परीक्षा. बीए का एमबीए अशी काहीतरी! मोठा झाला कृष्णा.

(गॅसवर भांडं चढवून खीर बनवायला घेते..)

कृष्णाची आवडती खीर! खीर बनवते बाळा!
(तसबिरीकडे वळत) ऐकलंत का? आपला कृष्णा! मैंने उसे पालपोसकर बडा किया है. आता नोकरीला लागेल. ह्या वाड्याला सूननातूमुख बघायची इच्छा आहे ती पूरी करेल.. मग नात नाहीतर नातू, मांडीवर खेळेल.. माझं लुगडं ओलं करेल. छे!

लुगडं कसलं! साडी ओली करेल माझी! साडी कशाला? गाऊन घालेन मी!

आणि छे! ओली कशाला?

आजकाल लहान पोरांना काय ते घालतात ना.. हगीज का काहीतरी. पोरं चड्डी ओली नाही करत म्हणे! त्यामुळे मुलांची वाढ लवकर होते म्हणे! टीव्हीवर सांगतात जाहिरातीत! मग खोटं कसं असेल? कृष्णाला लहानपणी वापरले असते तर तो अजून मोठा झाला असता का? कलेक्टर वगैरे? छे! जाहिरातीवाले काहीही सांगतात! सभी समस्याओंका एक ही जालीम इलाज..? हगीज?

(तसबिरीकडे पाहून)

आज तुम्ही असता ना तर किती छान झालं असतं!

आठवतं..

तीस चाळीस वर्षापूर्वी आपलं लग्न ठरलं तेव्हा.. मी तरूण नि तुम्ही तरूण.. मला पाहून सासूबाई म्हणालेल्या, मेरे घर लक्ष्मी आई है. मी जाताना म्हणालेल्या, थांब लक्ष्मी कुंकू लावते..

इकडे तुम्ही काहीतरी चाळे करत होतात. मला हसायला ही येत होतं नि लाजायला ही होत होतं! मी हसत हसत लाजत होते की लाजत लाजत हसत होते.. त्याकाळी नववधू लाजायच्या! इकडे सासूबाई

तुमच्याबद्दल काय काय सांगत होत्या, तिकडे तुम्ही कानात म्हणालेलात, तू छत पर आजा गोरिए!

मी लाजणार नाही तर काय?

म्हणाले, हटो जाओ! लोग क्या कहेंगे!

असं पण छतावर कशी चढणार होते मी? मी काय आमचा तो डॉन आहे? डॉन म्हणजे, बोका आमचा!

आज कृष्णा आणणार आहे म्हणे कोणाला तरी. म्हणजे आमची सूनबाई! या वाड्याची होणारी मालकीण. एकदा कृष्णाचे दोनाचे चार हात केले की मी काशीयात्रेस जायला मोकळी!

कृष्णाला म्हणाले तर म्हणतो, अगं एवढं प्लॅनिंग कशाला. घे दोन दिवस तीन रात्रींचं एखादं यात्रा पॅकेज! दोन चार दिवसात यात्रा! आहे काय नि नाही काय!

आठवतंय, कृष्णा लहान होता तेव्हा किती मस्तीखोर होता. बडा नटखट था यह कृष्णकन्हय्या.. तर काय करणार ही भागिरथी मैय्या.. तुम्ही म्हणायचात, बच्चा ही है. शरारत तो करेगा ही!

नि मी म्हणालेले, सच है. इस उम्र में आप भी कम शरारती नहीं हैं!

कृष्णा पोटात होता तेव्हा मी म्हणालेले, अजी सुनते हो, मैं तुम्हारे बच्चे की मां बननेवाली हूं. तेव्हा तुम्ही उचलून घरभर फिरवलेले मला.. त्यानंतर महिनाभर पाठदुखीमुळे झोपून होतात! डॉक्टर यायचे घरी.. इंजेक्शन देऊन म्हणायचे एक घंटेमें होश आ जाएगा! आधीच

पूर्ण शुद्धीत असणाऱ्याला अजून कसला होश येणार? पण कसे ते बेहोशीतले दिवस होते नाही?

आता सूनबाई येईल.. नातवंडाचं तोंड पाहिलं की मी सुखाने मरायला मोकळी. पण तसंच नाही काही! आजीच काय.. पणजी बनायलाही हरकत नाही माझी! गोव्याला न जाता!

(गॅसवरच्या भांड्यात चमच्याने खीर ढवळते. मग दोन थेंब हातावर घेत चव घेते. बाहेर येते. बाहेर खुर्चीवर झोपलेल्या कृष्णाला पाहते..)

कृष्णा!

तू कधी आलास?

नि डायरेक्ट झोपलासही?

कसं व्हायचं याचं. बसल्याबसल्या झोपतोय! डोळे उघडे टाकून! अगदी यांच्यावर गेलाय! ह्यांचं पण असंच! डोळे उघडे टाकून झोपायचे. डांगे कुळाची खासियत म्हणावी!

उठ बेटा!

एक बार मुझे मां कहकर पुकारो बेटा..

कब आए तुम? और तुम्हारी वो? वह नहीं आई? बडी देर कर दी बेटा!

देखो.. मैंने तुम्हारे लिए अपने हाथोंसे खीर बनाई है!

तुला म्हटले तर तू म्हणशील, बाकी चीजें पांव से बनाई है क्या मां? हे पण असेच होते.. भारीच विनोदी! त्यांच्या ह्या विनोदी स्वभावावरच तर भाळलेले मी!

उठ बेटा.. उठ..

नाही उठत?

मला वाटतं तुम्हें खीर सुंघाऊंगी तो ही उठोगे तुम. आणते एका वाटीत.

(आत जाते. वाटीत खीर काढते. बाहेर नाकाने लांबूनच खिरीचा वास आल्यासारखे करत कृष्णा अचानक उठतो. घड्याळ बघतो.. इकडे तिकडे पाहात..)

कृष्णा: रत्ना.. कुठे आहेस? अजून का नाही आलीस? इतका उशीर? झोपून झोपून डोळ्यांच्या खाचा झाल्या.. पण अजहुन न आई मोरी सजनिया.. बघून यायला हवं..

(झटकन बाहेर निघून जातो. खिरीची वाटी घेऊन भागिरथी येते. समोरील रिकामी खुर्ची बघून बावचळते..)

भागिरथी: अरे! आता होता.. गेला कुठे? का मला तो भास झाला? छळतो मला.. आभास हा! नाही! तो माझा कृष्णाच होता! एक मां की आंखें धोखा नहीं खा सकती!

कृष्णा.. लवकर ये रे बाबा.. धोखा खायला ये.. नव्हे खीर खायला ये रे! ही माता वाट पाहते आहे.. ही खीर तुझी वाट पाहते आहे.. तुझ्या वाटेकडे डोळे लावून उभी आहे मी वाटीत तुझ्या वाटची खीर घेऊन! ही वाटीही वाट पाहतेय असं वाटतंय..

(परत स्वयंपाकखोलीत जाते. बाहेर अप्पासाहेब वाघमारे हातात बंदूक घेऊन शिरतात.. इकडे तिकडे बंदूक रोखून शोधायला लागतात. बेडखाली, टेबलाखाली..)

(भागिरथी एकाएकी बाहेर येते..)

भागिरथी: कोण तुम्ही? इकडे काय शोधताय?

अप्पा: (दोन क्षण थबकतात. भागिरथी कडे पाहात स्तब्ध. मग एकाएकी दचकत..) मी? अप्पा वाघमारे.

भागिरथी: मग वाघाच्या मागे आलात की काय त्याला मारायला?

अप्पा: नाही हो! आमची मनी.. तिला शोधतोय!

भागिरथी: असे? फूल ना फुलाची पाकळी म्हणतात तसं वाघ ना वाघाच्या मावशीला शोधताय बंदूक घेऊन?

अप्पा: मावशी? मावशी कुठून आली? पण आमची काही लेव्हल आहे की नाही? मनी कोणाही बरोबर जाते म्हणजे काय!

भागिरथी: पण तुम्ही आत आलात कसे?

अप्पा: दरवाजातून. आमच्यात दरवाजातूनच येतात जातात. तुम्ही? खिडकीतून की काय? की पायपावरून चढून?

भागिरथी: पण आत शिरलाच कसे तुम्ही?

अप्पा: ह्या दोन पायांनी!

भागिरथी: हो का? तुमच्यात हातांवर पण कधी चालण्याची पद्धत आहे की काय? पण न विचारता आत आलातच कसे?

अप्पा: मग? आमच्यात आत न विचारताच येतात! भितो की काय! आघारकर वाडीच ना ही? आमच्या मनीला न विचारताच पळवून नेलंय. इकडेच आली म्हणे. पळवणारा बोका असणार! बोका कसला? बोकड! माझ्या मनीला फितवतोस काय रे बोक्या!

भागिरथी: आमच्या डॉनबद्दल बोलताय? अहो, त्यांच्या जोड्या काय? जमायच्याच!

अप्पा: मग? आपण धरबंद नको घालायला? उगाच बोक्याला मोक्याट सोडून कसं चालेल? मनी आमची जात्याच अशी! चोरून दूध पिते. डोळे मिटून. स्ट्रॉने..

भागिरथी: मनी स्ट्रॉने दूध पिते?

अप्पा: मग काय हो! तिला वाटलं कोणी बघत नाही. पण आम्ही बोळ्याने दूध पितो होय? ह्या शिकारी अप्पापासून कोणी बचावणार नाही. त्याचे नाव तुम्ही डॉन ठेवलेय?

भागिरथी: आमच्यात ठेवतात हो. उगाच नावावरून नावं ठेवायला नकोत म्हटलं! आणि डॉन काय नि मनी काय.. पण डायरेक्ट बंदुकीची गोळी? मुकी बिचारी!

अप्पा: मुकी? मुकस्तंभ! जीभ जणू चिकटलीय तिची. बोल म्हटलं, काय पाहिलंस त्याच्यात.. सांगून तरी टाक.. म्हटलं एक शब्द बोलू देणार नाही. मग पळाली त्याच्या मागोमाग. बोका! बोकोबा! बोकड!

भागिरथी: बोका? की बोकड? कुणीही असो! तुमचा सात्विक संताप समजते मी. पण तरीही बंदूक?

अप्पा: तुम्हाला म्हणून सांगतो.. जुन्या शिकारीची आठवण म्हणून. नाहीतर, ना ही बंदूक चालत, ना मला दूरचे दिसत, ना ही नेम धरवला जात! हात कापतात! पण तरणीताठीच्या पाठीत काठीसारखी हाणायला बरी पडते ही लाठी म्हणून! आणि बंदूक म्हटले की रूबाब वाढतो! कित्येक शिकारी केल्यात ह्या बंदुकीने.. पूर्वी आमच्या पूर्वजांनी! हम वो हैं जो अपना रोब झाडके ही जाते हैं जानी!

भागिरथी: नको हो. झाडू नका! आताच तर घर झाडलंय. परत कशाला? नाही म्हणजे आमचे दूरचे काका होते, स्वत:चे कपडे स्वत: धुवायचे, भांडी

स्वत: घासायचे.. तसलं तुमचं काही? स्वत: उभी रहायची जागा स्वत:च झाडायची! व्रत वगैरे असेल तर सांगा.. झाडू देते आणून. झाडून सारे घर काढा झाडून त्या झाडूनं. त्या मेनकेने विश्वामित्राचा तपोभंग केला तशी आता फट म्हणता ब्रह्महत्या नको. माझ्या हातून तुमचा व्रतभंग नको!

अप्पा: तसं नाही हो काही! झाडलोट कशाला?झाडू लोटा बाजूला थोडा. पण तुम्ही तिला कुठे पाहिलं का?

भागिरथी: नाही हो! मीच वाट पाहतेय..

अप्पा: मनीची? का? तुम्ही का तिची वाट पाहताय?

भागिरथी: मनीची नव्हे..

अप्पा: खरंय, मनी तुमच्या ध्यानीमनी कशी असेल? बोक्याची वाट पाहताय? येईल हो तो. मैं हू डॉन म्हणत!

भागिरथी: काहीतरीच तुमचं. पण छतावर असेल कदाचित!

अप्पा: डायरेक्ट? छतपर तू आजा गोरिए.. जिंदमरिए!

भागिरथी: काहीतरीच! जिंदा आणि मरिए एकाच वेळी! असेल बाई. आजकाल काही नेम उरला नाही. दिवसमान असे आलेत. पण येऊ द्या घरी, चांगली खडसावते!

अप्पा: खडसवा! की ही बंदूक देऊ? नाही. यह बंदूक हमारी आन है. यह बंदूक हमारी बान है. यह बंदूक हमारी शान है!

भागिरथी: खरंच! किती छान आहे!

अप्पा: आम्ही निघतो. ते खडसावण्याचे काम करा तुम्ही. म्हणावं हा नाद सोड सोड..

भागिरथी: सोडते!

अप्पा: अहो तुम्ही काय सोडताय? नाद?

भागिरथी: नाद नव्हे! हुकूम हो! तो सोडते नि सांगते!

अप्पा: परत पाहून घेतो कुठे लपली तर नाही!

(वाकून सगळीकडे पाहत..)

अप्पा: नाही. माझ्या तिक्ष्णातितीक्ष्ण शिकारी नजरेस नाही दिसत. म्हणजे नाहीच. दुर्बिण आणायला हवी होती का? नको! माझे हे डोळे अजून शाबूत आहेत! वटवाघळासारखी ही नजर!

भागिरथी: वटवाघूळ? गरूडासारखी म्हणायचीय का?

अप्पा: तेच ते हो! आणि निस्ता गरूडच कशाला? घार नि गरूड मिक्स! आम्ही निघतो. पण नजर ठेवा.. घारीसारखी!

भागिरथी: नक्की ठेवते. घारूडासारखी!

अप्पा: घारूड? हा कोण नवा पक्षी? किमानपक्षी सांगून टाका.

भागिरथी: तुम्हीच म्हणालेलात तो! घार नि गरूड मिक्स!

अप्पा: रागावणार नसाल तर एक सांगू?

भागिरथी: रागवायचं काय त्यात? हे गेले कधीच देवाघरी. आता रागावणार कोणावर?

अप्पा: तुम्ही कि नाही हुशार आहात फार!

भागिरथी: काहीतरीच बाई. उगाच कौतुक! तुमच्या या मिक्स पक्ष्याने गारूड केलंय म्हणाना! ते जाऊ द्या.. येऊ दे त्याला नि मी खाडखाड खडसावते..

अप्पा: आम्ही ही पावले टाकत निघतो, खाडखाड. काही धाक आहे की नाही आमचा? पाठीला बाक आला म्हणून काय झालं? उगाच आमच्या जिवाची धाक..धूक.. मनी.. कुठे कडमडलीस तू?

(अप्पासाहेब निघून जातात.. जाताना दोन तीनदा मागे वळून पाहातात.)

भागिरथी: तर आहे हे असं आहे म्हणायचं!

पहा ना!

या बोका नि मांजरीच्या मध्ये कुणी कशाला यावं?

की माणसांसारखेच इथे ही? स्वजातीय नि सजातीय विवाह?

विजातीय विवाहास विशेष विरोध?

असेल ही! काय सांगावं?

असतो मनुष्यस्वभाव आणि काय!

स्वभावाला औषध नाही! आणि औषधापुरता ही कोणी स्वभाव बदलत नाही!

स्वभावाचा प्रभाव असाच असायचा!

(घड्याळ पाहात..)

बाई बाई! इतका उशीर झाला.. पण अजून माझा कृष्णा कसा आला नाही? खीर थंड होतेय.

किती तो उशीर. देवा!

काही गडबड तर नाही ना.. नाहीतर हम किसीको मुंह दिखाने के काबिल नहीं रहेंगे..

तसलं काही असेल तर मी म्हणेन.. दूर हो जा मेरी नजरोंसे! ऐसे दिन दिखानेसे पहले.. हे भगवान, तुम मेरी आँखें छीन लेना.

की मुझे उठा क्यूं नहीं लिया म्हणू?

पण असं कशाला असेल?

मेरा बेटा मेरी शान है. मेरे संस्कार हैं उसपर!

लवकर ये बाळा..

खीर थंड होतेय.

हे भगवान!

देव पाण्यात ठेवू?

सर्दी झाली तर?

नको. त्यापेक्षा भैरोबाच्या मंदिरात साकडेच घालते..

येऊ दे रे बाबा माझ्या कृष्णाला लवकर!

खीर थंड होतेय.

भैरोबा.. येतेय रे मी!

रवळनाथा, सांभाळ बरं माझ्या कृष्णाला.

(बाहेर निघून जाते..)

हळूच बोका शिरतो.. डॉन. टुणकन् उडी मारत. थोडा पाय घसरतो. मग सावरतो. चार पायांवर उभा राहात..

डॉन: म्यांव.. मांजरी कुठूनही पडल्या तरी पायांवर पडतात.. त्यामुळे आहे ना

उभा मी, चार पायांवर! मी कोण?

अरे दीवानों.. मुझे पहचानो

छत से आया मैं हूं कौन.. मैं हूं कौन

अर्थात मीच तो. डॉन.

ज्याला पकडणे कठीणच नाही तर अशक्य आहे अशा जागतिक कीर्तीचा एकमेव जगप्रसिद्ध.. डॉन! पण नाही! त्या जोगळेकरांच्या जेनीनं पकडलं मला.

जेनी म्हणजे.. हाए!

माझ्या ह्या काळजाचा ठोका चुकतो तिचं नाव ऐकलं की ..

तिच्यामुळेच! क्या सुहाना मौसम था.. हम और तुम और ये समा..

जेनी छतावर आलेली. एकांत होता. तिला पाहिलं की काय बोलू नि काय नको असं होतं खरं. पण समोर आली की जीभ चिकटते जशी. ती मात्र म्यांव म्यांव करते एकटीच. मंजूळ ध्वनी तिचा ह्या कानात साठवून ठेवतो. घरी कुणी दिसत नाहीय.. तेव्हा आता ती रेकॉर्ड रिवाइंड करत बसेन म्हणतो.

जेनी ओ जेनी..

दिल तूने छेनी..

छेनी? बापरे! ही कविता वगैरे मुश्किल बाबा. प्रेमात पडलं की सुचते म्हणे कविता. पण कविता सुचल्याशिवाय ही पडत असणार कुणी ना कुणी प्रेमात! त्यातला मी देखील एक!

(इकडे तिकडे पाहात)

मला वाटतं कुणीतरी आलेलं घरी. कृष्णादादा येऊन गेला. मी जेनीशी बोलत होतो.. तेव्हा मी हळूच पाहिलेलं त्याला.

(वर तोंड करून वास घेत..)

हुं! खीर!

खिरीचाच सुगंध हा! खिरीचा चट्टामट्टा करू का?

नो! नेव्हर! मावशीबाईंनी माझ्या वाटची खीर राखून ठेवली असणारच. आणि दिसली समोर नि संधी साधायला मी मनुष्यप्राणी थोडीच आहे! चांगला चतुष्पाद आहे मी!

पण खीर आहे म्हणजे मावशीबाई आल्या असणार.. आणि नंतर एक बंदूकवाले कुणी आलेले. छतावरनं पाहिलं मी. आणि बोंबलत किती मोठ्याने होते. तो तिकडचा धन्नू कुत्रा.. त्याचा आवाज पण बरा त्यापेक्षा! तसं कुत्र्यांचं नि आमचं जमत नाही. पण त्या द्विपाद बंदुकवाल्यापेक्षा हा चार पायाचा प्राणी परवडला.

तर सांगत होतो माझ्या जेनीबद्दल.

काय गोड नाव. जेनी! जेनी जोगळेकर! जे जो! कानावरून शेपटी फिरवल्यासारखं. मृदु मुलायम!

(हाक मारत)

जेनी! जेनी! जेनीजेनी!

कुणी ऐकलं तर?

ऐकू देत! प्यार किया तो डरना क्या? क्या? सच है ना? सचमुचका प्यार. आशिकी.. प्रेम. इश्क. मुहब्बत. मला इतके सारे शब्द कसे

ठाऊक म्हणता? साधं उत्तर आहे. आमच्या मावशीबाई.. म्हणजे कृष्णाची आई.. बघत असतात टीव्हीवर हिंदी सिनेमे. मी पण बघतो ना. त्यातून शिकलोय. तर जेनी, मैं तुमसे प्यार करता हूं जेनी..

मुझे तुमसे मुहब्बत है दीवानगी की हद तक!

तुम्हाला सांगतो इतक्या मांजरी पाहिल्या, पण जेनी? तिला पाहिलं नि दिल की तार छेडली गेली. पहिल्यांदा डोळ्यात भरली ती तिची शेपटी. अशी शेपटी म्हणजे मार्जार कुलाचं सौंदर्यलक्षण!

जोगळेकराच्या अंगणात पांढरी शुभ्र जेनी पांढऱ्या ताटलीतलं पांढरं दूध लाल चुटूक जिभेने लपलप पीत होती. इट वॉज लव्ह ॲट द फर्स्ट साईट! तिला ही झालं असणार.. कुछ कुछ होता है! कां नाही होणार? माझ्या इतका हँडसम बोका याच काय, आजूबाजूच्या कुठल्याच वाडीत नाही. उगाच स्वत:ची स्तुती नव्हे, पण लोक म्हणतात ते सांगितलं एक!

पण त्या जोगळ्याला हे काय पटणार हाच एक प्रश्न आहे. आपली मांजर म्हणजे काय वाटली त्याला? अरे, कायद्याने सज्ञान आहे माझी जेनी. बालिग है वह! आणि डॉन जेनी राजी तो क्या करेगा जोगळ्या काजी? खरंय की नाही?

पण बंदुकियाला काय प्राॅब्लेम झाला असावा? बंदुकिया माझं नाव घेत होता ना? ऐकलं मी! त्याचा न माझ्याशी संबंध ना जेनीशी. उगाच

खांद्यावर बंदूक मिरवत चाललेला तो बंदूकधारी. आणि माझं नाव घेत होता? हाती बंदूक..

बापरे! त्या जोगळ्यानं तर नाही पाठवलेला त्याला? काँट्रॅक्ट किलर? चालव म्हणावं गोळी! एक नव्हे, सात गोळ्या लागतील! कां? अ कॅट हॅज सेव्हन लाइव्हस! पण ते ठाऊक असेल का बंदुकियाला?

पण माणसांच्या दुनियेत चालतं असं. उच्चनीच नि जातीधर्म. कुणी कुणाची रोटी खाणं नको नि बेटीशी ब्याहणं नको. पण आमच्या प्राणी दुनियेतही हे असली काही सुरू करणार काय? खाप पंचायत?

म्हणजे झाली का पंचाईत!

छे! प्यार किया तो डरना क्या!

नाहीच डरत मी! आणि छुप छुप आहें पण नाही भरत.

(उसासा टाकत..)

पाहिलंत खुल्लमखुल्ला आहें भरते हैं हम! त्यादिवशी ते गाणं ऐकलेलं ना..

खुल्लमखुल्ला प्यार करेंगे हम दोनों.. तसं. मग माझी जेनी म्हणेल.. इस दुनिया से नहीं डरेंगे हम दोनों!

काय होणार? कसं होणार?

आमची शतकानुशतकात अमर होईल अशी प्रेमकथा पुढे कशी सरकणार?

सरकेल! जेनी माझी होईल!

सध्या मिया बीवी राजी आहेत. तेव्हा..

जोगळ्या काझी.. जेनी आहे माझी!

अरे वा! जुळलं की यमक!

जमेल मला कविता! प्रेमात पडलं की आपोआप जमत असणार!

मी म्हणेन जेनी.. डॉन लव्हस यू..

तू लाजून शेपटी हलवशील.. होकारार्थी! पापण्यांची पिटपिट करत लाजशील.. जायला निघशील नि मी म्हणेन.. अभी ना जाओ छोडकर की दिल अभी भरा नहीं..

लागेल आमची प्रेमनौका पार?

लागायला हवी. हवीच!

पण सध्या मात्र वाट पाहातोय..

डॉन लव्हस जेनी

आणि जेनी लव्हस डॉन..

तर..

आहे हे असं आहे!

वरून म्यांव आवाज येतो..

अरे, हा तर जेनीचा आवाज. उसके दिलकी पुकार. जेनी परत आली वाटतं. जायला हवं..

निघतो मी..

जेनी डॉन लव्हस यू

जेनी लव्हस डॉन..

- तर आहे हे असं आहे!

४.

(घाईघाईत कृष्णा घरात शिरतो. 'आता होती, गेली कुठे.. नाही, अजहून न आई बलमा.. लेट होवत जाए..' म्हणत.. इकडेतिकडे फेऱ्या मारतो नि मग त्या खुर्चीवर बसायला जाणार तोच रत्ना आत शिरते..)

रत्ना: ठहरो..

(तो चपापून थांबतो.)

रत्ना: ये नहीं हो सकता. काही कर पण तिकडे बसू नकोस, परत झोपशील. यह पोलिसस्टेशन है.. तुम्हारे बापका घर नहीं..

कृष्णा: नहीं.. ये तेरा घर ये मेरा घर.. नहीं बैठता.. जो हुकूम सरकार!

रत्ना: सरकार म्हणे! मी आले तर कुंभकर्ण ढाराढूर. ढेर हो गए हमारे शेर! माझ्या मंडुका, अप्पा आले घेऊन बंदूक तर काय करणार? कंटाळून मी समुद्रावर गेले तर तुझा पत्ता नाही. आता परत आले तर हे कृष्णाजी परत झोपण्याच्या तयारीत!

कृष्णा: क्षमस्व महाराणी जी..

रत्ना: डोन्ट अँग्री मी!

कृष्णा: सॉरी! कान नाक डोळे पकडून सॉरी. पण येऊ दे कोणालाही! जिंदगी में यह कभी न करना बसंती.. डोन्ट अंडरेस्टिमेट आय, मी, मायसेल्फ!

रत्ना: ॲहा रे, एस्टिमेटच नसेल तर अंडर एस्टिमेट काय करणार? बस..

कृष्णा: बस.. बस.. बसंती.. तुम्हारा नाम क्या है बसंती?

रत्ना: यूं तो हमें जादा बोलनेकी आदत नहीं .. पण मी आले तेव्हा तू झोपलेलास? दिवसाढवळ्या? ते ही हे मंडुकनयन उघडे ठेऊन..

कृष्णा: डांगेकुळाची खासियत आहे ती रत्ना..

रत्ना: मोड ती करून प्रयत्ना.. कृष्णा! तुझसे मिलने की थी तृष्णा.. राहोंमें कितनी भी कठिनाइयां हो.. मंजिल कितनी भी मुश्किल लगे.. दूर से आई.. देरसे आई.. सब दुनिया को चुकाते आई.. खफा न होना.. ओ मेरे राजा.. वादा तो निभाया! तुला सांगते, अप्पा कधीही येतील इकडे..

कृष्णा: बंदुकधारी! आई कोठेय?

रत्ना: काय? तुझ्या आईकंडेही बंदूक आहे? आज बंदूक व्हर्सेस बंदूक? भला तुम्हारी बंदूक मेरी बंदूकसे लंबी कैसे?

कृष्णा: चुप ग! माँ? तुम कहां हो मां? देखो तुम्हें मिलने कौन आया है मां..

रत्ना: मी येऊन गेले नि तुला पत्ता ही नाही? तर आई पण येऊन गेल्या असतील. तू झोपला असशील गपगार! उघडनयन!

(कृष्णा नाकाने लांब श्वास घेत..)

कृष्णा: खरंय..

रत्ना: काय खरंय?

कृष्णा: तुझं म्हणणं खरंय.. खीर!

रत्ना: मी कुठे म्हणाले खीर?

कृष्णा: खीर..

रत्ना: तू काय बोलायला शिकवतोयस.. खीर..

(आत जाऊन खीर पाहातो.. बाहेर येत..)

कृष्णा: खीर बनवलीय आईने.. म्हणजे ती येऊन गेली असणार! पण मला न उठवता गेली?

रत्ना: खीर? पण मला तर बोललेलास तू.. मम्मीने तेरे चाय पे बुलाया है म्हणून.. खीरपे बुलाया नव्हता म्हणालास!

कृष्णा: माँ.. तुम कहां हो? हाय ये मेरी नींद! कसा झोपलो मी! मेरा तो बॅडलक ही खराब है! डोक्याला हेडेक नुसता!

रत्ना: आणि माझे अप्पा येतील कधीही!

कृष्णा: सबंदूक? आने दे कोई भी संकट रत्ना.. मैं हूं ना! काही धोका तर पत्करावा लागतो प्रिये! नो पेन नो गेन! आणि लाइफमें सबसे बडा रिस्क तो रिस्क न लेना है प्रिये! अब आंधी आए या तुफान.. माझ्या मना घे शपथ.. अग्निपथ! अग्निपथ! अग्निपथ!

रत्ना: खरंच? पण हम सब इस संसार नामके रंगमंचपर कठपुतली की तरह हैं कृष्णा. सब कुछ उपरवाले के हाथों में. वह उपरसे हमें नचा रहा है. पण माझा विश्वास आहे कृष्णा, दिलसे मांगो तो पूरी कायनात जुड जाती है दो प्रेमियोंको मिलाने.. मग त्यापुढे अप्पांची बंदूक ती काय!

कृष्णा: होय प्राणप्रिये, अनमोल रत्ना.. हम दिलवालों की बात ही ऐसी है! यूं तो दिल हर एक के पास होता है, पर सब दिलवाले नहीं होते! तुझे अप्पा येऊ देत.. सांगेन मी, दिलवाले दुल्हनिया ले जाएंगे!

रत्ना: आणि घरवाले देखते रह जाएंगे! नाहीतर आपण पळून जाऊयात घोडागाडीतून?

कृष्णा: पळून? पण पळणार कोण? घोडागाडी की आपण?

रत्ना: घोडागाडी.. त्यात एक खुर्सी और हम दोनों.. आपल्यामागे अप्पांची गाडी.. आपली गाडी पळतेय पुढे.. मी म्हणेन, चल मेरी शन्नो.. तुम्हारे इस बसंती के इज्जत का सवाल है..

कृष्णा: शन्नो नाही धन्नो!

रत्ना: मग मध्ये मोठी नदी येईल. घोडागाडी डायरेक्ट बोटीत!

कृष्णा: आई शपथ! रो रो सर्विस!

रत्ना: अप्पा मागे अडकतील.. आपण पुढे निघून जाऊ.. पाठून म्युझिक.. आज किसी की हार हुई है और किसी की जीत..

कृष्णा: मग! कोणाला घाबरतो की काय..

(पाठून अप्पासाहेब आत शिरतात. बंदुकीची नळी कृष्णाच्या पाठीला..)

कृष्णा: असं काय रत्ना डार्लिंग! पाठून अशी बोटे का टोचतेयस? घाबरतो की काय? खरी बंदूक असेल तरी बेहत्तर!

रत्ना: (पाठी वळून किंचाळते..) अप्पा तुम्ही?

(कृष्णा दुर्लक्ष करत..)

कृष्णा: अप्पा ऑर गप्पा.. मला नाही फिकर.. मत करना उनका मेरे सामने जिकर

(एकाएकी अप्पांना बघून कृष्णा घाबरतो. हात वर करून उभा राहतो.)

अप्पा: रिश्ते में हम तुम्हारे बाप लगते हैं, नाम है अप्पाशहां. अप्पा.. अप्पा वाघमारे. हँडस अप बोलेबिनाही हाथ उपर? लगता है आदत है! हम

किसीसे कम नही? हमें किसीका डर नहीं? हा!हा! अब आया ना हा पहाड उंट के नीचे!

रत्ना: तसं नाही अप्पा..

अप्पा: नाही म्हणू नकोस मनी..

रत्ना: तसं नाही..

अप्पा: तसंच. मनी तसंच..

रत्ना: नव्हे अप्पा.. उंट पहाड के नीचे असतं ते..

अप्पा: मनी, मला शिकवते! काहीतरी कशाखालीतरी येतं.. हा सापडला तुझा डॉन!

रत्ना: डॉन?

अप्पा: मला ठाऊक आहे. हा बोका.. नाम है डॉन. डॉन चोप्रा! व्हिलन नंबर वन. छतपर जाऊन बसतो का रे?

रत्ना: पण किती गोड आहे हा.. कृष्णा.. बोका नाही बोकड नाही, ब ब बेडकातला! मेरा बेडूक! लहानपणी अगदी टॅडपोल दिसायचा.. शेपटासकट!

(कृष्णा वाकून नमस्कार करत..)

कृष्णा: पैरी पौना बाबूजी..

अप्पा: काय रे? पैरी पौन्या वैरी! दुसरी कोणी नाही सापडली?

कृष्णा: नाही. शोधली नाही..

अप्पा: निर्लज्ज, बेरहम, बेमुर्वत, बेशरम, बे..

रत्ना: हया.. बे हया चालेल अप्पा?

अप्पा: बेहया.. बेकार, बेकरी.. बेलगाम..

रत्ना: बेळगाव नाही हे. रत्नागिरी आहे अप्पा..

अप्पा: बे..रफण कार्टी. तुझ्याकडे नंतर पाहतो. आज मैं इसे मौत के घाट न उतारूं तो मेरा नाम भी अप्पा वाघमारे नहीं. वाघ मारलेत आमच्या पूर्वीच्या पूर्वजांनी! त्यापुढे ह्या मच्छराची काय कथा! कछुआ जलाओ.. मच्छर भगाओ! पण त्या आधी जरा गंमत..

रत्ना: तुम्हाला गंमत सुचते अप्पा? बिचारा घाबरलाय किती?

अप्पा: कोणाला घाबरत नाही ना हा? कोकरू? नाही बोका! बोकोबा! बोकड! नव्हे, बेडूक! अरे, भगवान ने दिया हुवा सब कुछ है. इज्जत है, दौलत है, शोहरत है.. आईविना वाढवलेली म्हारी छोरी छोरोंसे क्या कम होवे है? बोल बेडका बोल.. का द्यावी मनी तुला?

कृष्णा: क्योंकि मैं हर टेस्ट पास करता आया हूं.. चाहिए तो मेरा ब्लड टेस्ट करके देखना! हमारा खून एकदूजे के रग में बहता है. बी पॉझिटिव्ह..

रत्ना: नाही काही.. मी ए निगेटिव्ह!

कृष्णा: दुनिया की हर खुशी इसे दूं.. चांदसितारें तोड के लाऊं..

अप्पा: त्यांचं काय लोणचं घालायचंय? आणि अकलेचे तारे तोडतोयस ना तेवढे बास आहेत! बंदूक नंतर. तुम्हारे सरपर पहले बम फोडूं तो पहले क्या फटेगा? सर या बम? बोल बम बम भोले..

रत्ना: अप्पा.. हे काय? बंदुकीने कुठले प्रश्न सुटतात? सम्राट अशोकाला ते नंतर कळले..

अप्पा: चिडीचुप्प.. अशोकाने तुला येऊन सांगितले? एवढीशी चिडिया होती आता कोकिळेसारखा कंठ फुटला होय? अरे, पचास कोस दूर गांव में बच्चा जब सोता नहीं था तो मां कहती थी, सो जा, नहीं तो अप्पा आ जाएगा.. आतंक का दूसरा नाम है अप्पा वाघमारे! नाम तो सुना होगा!

कृष्णा: नाही बुवा!

अप्पासाहेब(दुर्लक्ष करत): हा हात नाही, ढाई किलो का हथौडा आहे. मुंडी पिरगळली तर पुढची बाजू मागे नि मागची पुढे होईल.. हथौडा.. उसके नीचे मरेगा मकौडा! हा! हा!

कृष्णा: बोलून घ्या. आज खुश तो बहुत हुए होंगे आप अप्पासाहेब!

रत्ना: लेकिन हमारा प्यार अमर है. एक दूजे के लिए है यह वासू सपना की जोडी..

अप्पा: वासू सपना? नाही बोका आणि मांजर. परंपरा, प्रतिष्ठा, अनुशासन वाघमारे कुलके तीन स्तंभ हैं. तुमच्यासारखे नाही मुखस्तंभ!

कृष्णा: डोन्ट अंडर एस्टिमेट द पॉवर ऑफ अ कॉमन मॅन. अवर बिझिनेस इज नन ऑफ युवर बिझिनेस!

अप्पा: उगाच इंग्रजी झाड झाड झाडू नकोस, नि फाड फाड फाडू नकोस .. आय कॅन टाॅक इंग्लिश आय कॅन वॉक इंग्लिश.. अजून सांगतो, अपनी औकात में रहना. तुम्हारी जान बक्श दूंगा.. भूल जा इसे..

कृष्णा: नहीं, ये नहीं हो सकता.. फा इन लॉ..

अप्पासाहेब: ये फा इन लॉ क्या है?

रत्ना: क्या नहीं अप्पा.. कौन है विचारा!

अप्पासाहेब: ठीक आहे! कऊन है इ फा इन लॉ? चौ एन लॉ का भाई या पिता?

रत्ना: अप्पा.. तुम्ही. लॉ मधले फाॅ.. नाही फा.. म्हणजे कायदेशीर फादर.. सासरे..

अप्पा: ससुरा हमें ससुर बुलावत है? तुम्हारी ये जुर्रत? दूर हो जा मेरी नजरोंसे..

रत्ना: दूर तर जाईल तो, पण मग ती बंदूक..

कृष्णा: बंदुकीतून सुटलेली गोळी परत जात नाही. ट्यूबसे निकली टूथपेस्ट वापस नहीं जाती. भेजा हुआ एसेमेस वापस नहीं आता.. एकबार दिया हुवा दिल हम वापस नहीं लेते.. अटी और शर्तें गैरलागू!

अप्पा: वेळ झाली आहे.. आता ह्यातील गोळ्या आरपार जाण्याची.. कुठेही जाऊ नका.. बघत रहा.. बंदूक आज तक..

(नेम घेत उभे राहातात. कृष्णा उगाच हलत राहतो. अप्पा कसाबसा नेम घेत राहतात..)

रत्ना: कृष्णा! अप्पा नेम धरताहेत! त्यांच्या नेमाचा काही नेम नाही! लागेलही कदाचित! मग आपलं नेमोनिशाण.. नाही नामोनिशाण राहिल का?

अप्पा: खामोश! इतका हलू नकोस रे बाबा. ही बंदुकीची गोळी आरपार जाईल. तिच्यावर मी पेनजाॅनपण चिटकवली आहे. दुखेगा नहीं, बिलकुल पण. हिलने का नहीं. गोळी वाया जाऊ द्यायची नाही

रत्ना: नहीं. कानून को अपने हाथ में मत लेना अप्पाश्री. गौहत्या, ब्रह्महत्या.. तशी ही युवकहत्या! कदापि नाही! ये नहीं हो सकता! आज मां जिंदा होती तो क्या कहती? एका निष्पाप तरूण हत्येचे पाप तुमच्या डोक्यावर?

अप्पा: हा पापी निष्पाप? मांजर मारली तर पातक.. बोक्या! पुराणात सांगितलं आहे! माणूस मारला तर चालतं!

रत्ना: मांजर नव्हे हा माझा मेंडुक आहे (जीभ चावत) .. पुलिस को बुलाइए अप्पाजान ..

कृष्णा: चालेल, प्यार किया कोई चोरी नहीं की.. आता होऊन जाऊ दे.. दूधका दूध.. पानी का पानी..

अप्पा: अरे वह रामलुभावन भय्याजी, सुबह सुबह इतना पातळ दूध डालत है.. पण चालेल. (लांब टांगा टाकत चालत) कानून के हाथ लंबे होते हैं!

रत्ना: (अप्पांच्या पायांकडे बोट दाखवत) हां और पैर भी!

कृष्णा: आणि कानूनके बंदूककी नली भी लंबी होती है! (बंदुकीला हात लावत) खरी आहे की खेळण्यातली?

अप्पा: ठहरो! मेरी आवाज सुनो.. मनी, ह्या लफंग्यावर लक्ष ठेव. मी पोलिसांना फोन करतो..

रत्ना: होय अप्पा.. जी चंगा! चल लफंगा.. मत कर दंगा.. थांब तुझ्यावर लक्ष चांगले ठेवते.. पित्याची आज्ञा आहे! पाळायलाच हवी!

(अप्पा फोन लावताहेत. कृष्णा नि रत्ना एकमेकांसमोर. डोळ्यात डोळे घालून बसले आहेत..)

अप्पा: हॅलो.. पोलिस स्टेशन .. जंगली? वन्यप्राणी समाजाचे ऑफिस?. एक बोकड आहे इथे .. पकडून नेता का? काटला फोन.. राँग नंबर?

(परत नंबर फिरवत)

हॅलो.. कोण? वनितास माज? नाही? वनिता समाज? तेच ते, पण मला पोलिस स्टेशन हवंय.. काय? राँग नंबर?

(अप्पा मागे जाऊन फोनवर बोलत राहतात.)

कृष्णा आणि रत्ना: जनम जनम का साथ है तुम्हारा हमारा .. तुम्हारा हमारा..

हम तुम युग युग से ये गीत मिलन के गाते रहे है.. गाते रहेंगे..

अप्पा: (पुढे येतात) एक पोलिस स्टेशनचा नंबर लागू नये? राँग नंबर म्हणे! अरे बाबा, राँग नंबर है तो उठातेही क्यों हो?

(दोघांकडे लक्ष जातं..)

अप्पा: अस्सं! आहे हे असं आहे तर..

बेशरम.. निर्लज्ज.. निलाजरे.. नि..

रत्ना: निष्पाप..

अप्पा: निष्पाप.. चुप चिडिया. मनीमाऊ. निष्पाप?निष्पाप म्हणे! इथे बापासमोर ह्या बोक्याबरोबर..

रत्ना: बेडूक अप्पा..

अप्पा: ह्या बेडकासारख्या बोकडाबरोबर नसते चाळे.. आता मलाच काहीतरी करायला हवंय..

रत्ना: कां? पोलिस नाही येणार?

अप्पा: कसे येतील? शेवट जवळ आला का? ते येणार सर्वात शेवटीच! एक फोन लागेल तर शपथ!

रत्ना: मेरा दिल कहता है.. वो जरूर आएंगे..

अप्पा: आता हे वो कोण?

रत्ना: पोलिस.. तुमची अगदी आतून इच्छा असेल ना तर तसं झाल्याशिवाय रहात नाही..

अप्पा: असं म्हणतेस?

रत्ना: पूरी कायनात जुड जाएगी..

अप्पा: कोणाची नात? पण असेल बुवा.. त्या काय म्हणतात त्या कायनातीचा काय नेम नाही!

रत्ना: असेल नाही.. आहेच अप्पा. जिवंत उदाहरण समोर आहे..

अप्पा: कुठे?

रत्ना: मी आणि माझा हा बेडूक! दुनिया की कोई भी ताकद हमें जुदा नहीं कर सकती! हो की नाही कृष्णा? सच्ची ना?

कृष्णा: मुच्ची.. मेरी प्रियतमा.. आपल्याला दुनियेची काय तमा?

अप्पा: खामोश! विधात्या का इतका कठोर झालास? मां के बिना एक लडकी. मैंने पाल पोसकर इसे बडा किया. ऐसा दिन देखने के लिए? आता करावे तरी काय? बंदुकीचा उपयोग करण्यावाचून पर्याय नाही.. बोडका.. नाही बोकडा.. बेकडा.. बेडका रहा उभा.. ही बंदुकीची गोळी तुझ्या काळजाचा घेईल वेध.. हाच माझा लक्ष्यभेद!

रत्ना: कां कठोरवचन अप्पा..

कृष्णा: रत्ना.. नकोस करू चिंता. हम जियेंगे अपनी मर्जीसे और मरेंगे.. तुमपर .. अपनी मर्जीसे..

(बाहेरून सायरन. एक पोलिस इन्स्पेक्टर आत शिरतो. शिट्टी वाजवत..)

कोई हलेगा नहीं.. चारों बाजूंसे हमारे माणसोंने घोर नहीं.. घेर लिया है..

(कृष्णा आणि रत्ना स्तब्ध उभे. अप्पा पुढे येत..)

अप्पा: मी वाघमारे. अप्पा वाघमारे नाम है मेरा. रत्ना, तू म्हणाली ते खरंच. कायनात पटकन जुड गई .. म्हणून इन्स्पेक्टर खुद्द इतक्या लवकर?

इन्स्पे.शिंदे: ओ साहेब! कहीं पर पहुंचने कहांसे तो निकलना पडता है! हिलना नहीं.. चारी बाजूला आमची माणसं आहेत. (उगाच सॅल्यूट ठोकत) मी इन्स्पेक्टर जयसिंग शिंदे. तुम्हाला वेगळं सांगायला हवं?

अप्पा: पण तक्रार माझी होती. मलाच उभे..

शिंदे: असेल. मराठी कळत नाही? इंग्रजीत सांगू? स्टॅंड अप.. नो वन मूव्हिंग.. काय गोंधळ घोटाळा आहे..

अप्पा: तुम्हाला कळलं कसं? माझा तर फोन लागला नाही.. सगळे रॉंग नंबर मागून रॉंग नंबर..

शिंदे: राँग करणार तर नंबर पण राँगच लागणार का नाही? राँग करताना विचार करा. नंतर मग आले पोलिसांमागे. अरे, आम्हाला दुसरी कामं आहेत की नाहीत?

अप्पा: तुम्ही आलात. मंडळ आभारी आहे.. पण आता तुम्हीच निस्तरा सारं. प्रथम लंफग्याला ताब्यात घ्या..

शिंदे: जसं तुम्ही म्हणाल तसं..

(शिंदे अप्पांनाच पकडून जायला निघतो.)

अप्पा: ओ इन्स्पेक्टरसाहेब! जरा आजूबाजूला इन्स्पेक्ट तर करा. लफंगा मी दिसतोय? की हा? लफंगत्व चेहऱ्यावर झळकतंय नुसतं! याला माणूस म्हणावं तर अक्कल नाही आणि गाढव म्हणावं तर शेपूट नाही. डॉन म्हणे. पकडा त्याला!

शिंदे: (कृष्णाकडे वळून) काय डॉन साहेब.. नाव काय आपलं?

कृष्णा: कृष्णा सदाशिव डांगे..

शिंदे: हे साहेब म्हणतात ते खरं का?

कृष्णा: नाही साहेब..

शिंदे: म्हणजे हे खोटं बोलताहेत..

कृष्णा: नाही साहेब..

शिंदे: म्हणजे तू लफंगा आहेस ..

कृष्णा: नाही साहेब..

शिंदे: म्हणजे हे साहेब लफंगा.. लफंगे .. तू ओळखतो या साहेबांना?

कृष्णा: होय साहेब.. नाही साहेब

अप्पा: ओळखत नसेल पण आता ओळखून राहिल..

शिंदे: (मोबाइलवर बोलत) यस्सर, मी इथे आहे, मौका ए वारदातपर.. जरा चश्मदीद गवाहोंसे बोलता हूं.. मुआईना करतो सर.. हो सर.. बाइज्जत बरी? बरे सर?

अप्पा: अहो साहेब, बरी करायला तुम्ही..

शिंदे: साहेब, प्रोसेजिरप्रमाणे होऊ द्या.. तर कृष्णा डांगे, सांग आपली कृष्णकृत्ये..

कृष्णा: कृष्णकृत्ये? कृष्णाने केलेली की वर्णाने कृष्ण असलेली? कसा करावा विग्रह नि सोडवावी संधी?

शिंदे: इथे मराठीचा वर्ग घ्यायला आलोय? सांग, ह्या साहेबांनी का तक्रार केली?

अप्पा: साहेब मी सांगतो ही संधी साधून..

शिंदे: खामोश! ज्याला विचारलं त्यानीच बोलावं..

रत्ना: मी सांगू? यही तो मेरा दिलदार है..

शिंदे: ज्याला विचारलं त्यानीच सांगावं..

रत्ना: म्हणूनच तर साहेब. तो आणि मी वेगळे थोडीच आहोत? दो जिस्म मगर एक जान हैं हम.. हो की नाही जानू..

कृष्णा: होय शिंदेसाहेब, माझी लव रत्नू .. हिच्या बाबा शप्पत..आपल्याला दोन गोष्टी लई आवडतात, काजू कतली आणि माझी रत्नू पतली!

अप्पा: निर्लज्जपणे बोलतोय कसा.. गिरफ्तार कर लो इसे. एकभी आदमी छुटने न पाए..

शिंदे: मेव्हणे मेव्हणे आणि म्हेवण्यांचे पाहुणे.. एकच तर आहे.. आदमी!

अप्पा: साहेब, एकच! पण लयभारी! हा बोका माझ्या मनीवर डोळा ठेऊन आहे..

शिंदे: पोलिस ने तुम्हें घेर लिया है. अपने आपको कानून के हवाले कर दो.

कृष्णा: पण इन्स्पेक्टर साहेब, आम्हाला आमचा गुन्हा तर कळू द्यात.

रत्ना: और अटकका वॉरंट है?

शिंदे: दफा तीनसो दो पॉइंट पाच और तीनहजार चारसौ बीस पॉइंट उन्नीस खाली.. त्या आधी अप्पा.. उन्नीस बीस नको.. नुसत्या मारणार गप्पा की सांगणार यांचा गुन्हा? की येऊ नंतर पुन्हा?

अप्पा: अर्थात. तुमच्या समोरच आहे सगळं! ही माझी निरागस निष्पाप आणि अजाण मुलगी. रत्ना. मनी म्हणतो मी तिला. तळहातावरच्या फोडासारखी जपलीय मलम लावत लावत. अति सालस, सुंदर, सुशील आणि सु..

रत्ना: लक्षणी? सुलक्षणी अप्पा?

अप्पा: सुलक्षणी अशी माझी एकुलती एक कन्या. जिच्यासारखी नाही कोणी अन्या. तिला ह्या लुच्च्या, लफंग्या, ल..

रत्ना: बाड.. लबाड अप्पा..

अप्पा: लबाड बोक्याने लावलीय फूस. तिच्या नादान वयात तिच्या नकळत तिला नादी लावलंय.. आणि पुन्हा विचारता काय गुन्हा?

रत्ना: पण अप्पा.. ही इज सो मच एम एम..

अप्पा: एम एम? म्हणजे?

रत्ना: मॅरेज मटेरियल अप्पा.. आजकाल ते गायब होत चाललंय! मला पाहिलं नि म्हणाला..

कृष्णा: रहना है तेरे दिल मे!

अप्पा: का? दुसरी जागा नाही? भाड्याने घेतलीय जागा?

कृष्णा: सासरे, आमचं नाणं खणखणीत! एकदम कडssक.. हम बने तुम बने एक दूजे के लिए! हो की नाही रत्ने..

रत्ना (लाजत): आम्ही नाही जा!

अप्पा: बघा, इन्स्पेक्टर साहेब. कबुली जबाब घ्या लिहून. उंदीर कुठचा. चुकीला माफी नाही! साहेब ह्या बिनशेपटीच्या उंदराचा कबुलीजबाब लिहून घ्या! आणि त्याला कढी से कढी सजा दी जाय!

रत्ना: नाही अप्पा..

अप्पा: का नाही? मिळायलाच हवी सजा..

रत्ना: तसं नाही.. कढी से कढी नाही

अप्पा: का? जैसा गुन्हा वैसी सजा..

रत्ना: अप्पा, कडी से कडी.. कढी नाही!

अप्पा: कढी नाही? पत्ता है मुझे! कडी से कडी देना सजा.. इस चूहे को!

शिंदे: एक मिनिट! अप्पासाहेब! उगाच शिळ्या कढीला ऊत नका आणू!
तुम्ही कधी वाघ मारलायत की नावाचेच वाघमारे?

अप्पा: अर्थात मारलाय. पेंढा भरून टांगलाय दिवाणखान्यात! आजही
शिकारीला जाताना घेऊन जातो तो!

शिंदे: मग आता हा उंदीर कशाला मारताय? तो ही बिनशेपटीचा! मला एक
सांगा.. तुमची मुलगी सज्ञान आहे की अज्ञान?

अप्पा: अर्थात अजाण, अजागळ, अज्ञान, अ..

रत्ना: र्धवट.. अर्धवट अप्पा..

अप्पा: आणि अर्धवट. म्हणून तर ह्या लांडग्याने फसवलं तिला..

शिंदे: तुम्ही कुठल्या झू मध्ये होता का हो? बोका, बोकड, बेडूक, उंदीर..
आता लांडगा? उद्या डायनोसॉर म्हणाल!

अप्पा: म्हणू आम्ही. ह्याला पकडा. नामशेष करा.. मग म्हणू या
घोड्यासारख्या गाढवाला डायनोसॉर! तुम्ही पकडताय की मीच करू

खेळ खल्लास? माशाला पोहायला नि बापाला ठोकायला शिकवावं लागत नाही!

शिंदे: तर तुमची मुलगी.. अज्ञान? वय किती?

रत्ना: (पर्समधून कार्ड काढत) इन्स्पेक्टर साहेब, मैं बालिग हूं. यह देखो मेरा आधार कार्ड!

अप्पा: ज्याने आधार द्यायचा तेच आधार कार्ड दाखवतेस? कुठे दाखवू मी तोंड?

कृष्णा: इन्स्पेक्टर, अगर किसीसे प्यार करना गुनाह है.. तो हां मैंने गुनाह किया है. अगर किसीको चाहना गुनाह है, तो किया है मैंने गुनाह! दीजिए मुझे सजा! कडी से कडी.. सासरे, पत्ता है.. कढी नाही.. गुनाहगार हूं मैं. इसलिए मुझे पहना दो हथकडी..

रत्ना: हां कृष्णा.. प्यार की हथकडी! पड गई प्यार की हथकडी!

अप्पा: बेटी, ये तूने क्या किया? घराने की इज्जतका जरा भी खयाल नहीं आया तुम्हें?

शिंदे: अस्सं! आहे हे असं आहे तर! दोघेही बालिग आहेत, कायद्याने सज्ञान आहेत.. मग फूस लावली म्हणून धुसफूस करून कसे चालेल अप्पासाहेब.. जो गुन्हा घडलाच नाही त्याची कोण कशी देणार शिक्षा. वारदात ही नहीं तो कैसा मौका ए वारदात?

कृष्णा: खरंय इन्स्पेक्टर साहेब. अजी जे घडलेचि नाही.. त्यात कसा तू गुन्हा पाही?

शिंदे: त्यापेक्षा अप्पासाहेब, म्हणून टाका, कुर्यात सदा मंगलम!

अप्पा: इन्स्पेक्टर, दंगलम होईल.. आता जास्त कुऱ्यात बोलायला नकोय..
तुम्ही जा, आमचा हात भारी, आमची लाथ ही भारी.. बघून घेऊ
आम्ही.. निस्तरू लफडी सारी..

(इन्स्पेक्टर जायला निघणार तोच भागिरथी आत शिरते..)

भागिरथी: बाई बाई! केवढा हा गोंधळ! बाहेर आवाज येतोय! कृष्णा तू कधी
आलास? (रत्नाकडे पाहात) आणि ही कोण? (अप्पांकडे पाहात)
आणि तुम्ही आलात परत? सापडली वाटतं मनी तुमची!
(जयसिंगकडे पाहात) जय? तू? कधी आलास दौऱ्यावरून? आणि
अशा अवतारात?

कृष्णा: आई, तो जय नाही विजय आहे. जयचा जुळा भाऊ! विजयसिंग शिंदे!

भागिरथी: जुडवा? कब कैसे? कहां? मुझे कोई कुछ बताता ही नहीं. जुळा?
जयला जुळा भाऊ? विजय? कधी? कुठे? आजवर पता नहीं चला?

कृष्णा: आताच तर माहिती पडलंय! आम्हाला नि त्याला ही!

रत्ना: मला वाटतं जुळ्यांचा जन्म एका पाठोपाठच होतो! दोन चार मिनटं
इकडे तिकडे! तेव्हा आधी जय.. पाठोपाठ विजय! किंवा उलट..

अप्पा: गोलमाल मधल्या राम लखन प्रमाणे?

भागिरथी: पण जयसिंग नाही कधी बोलला?

कृष्णा: त्याला तरी कुठे माहिती होतं आई.. कुंभमेलेमें बिछडा.. अभी डायरेक्ट मिला! एक पोलिस बना..

अप्पा: दुसरा चोर? कहीं यह चोरपुलिस तो नहीं खेल रहे?

भागिरथी: आज काल काही भरवसा नाही. कुछ भी हो सकता है! कुछ भी हो सकता है!

शिंदे: हो ना! आणि कुठे कुठे कुछ कुछ होता है.. कुठे असं पण होता है!

भागिरथी: असेल बुवा होत! आजकाल काहीही होऊ शकतं..(रत्नाकडे पाहात) कृष्णा ही कोण?

अप्पा: त्याला नका विचारू! ही माझी मनी!

भागिरथी: ही? ही तुमची मनी? आणि बोक्यामागे?

अप्पा: बोका नाही, बोकड! त्या बोकडामागे लागलेली!

भागिरथी: म्हणजे? छतपर चढलेली?

अप्पा: (कृष्णाकडे बोट दाखवत) नि हाच तो.. बोकड.. बोका. डॉन!

भागिरथी: बाई बाई. हद्द झाली. डॉन हा नव्हे! हा माझा कृष्णा! म्हणजे ही त्याची रत्ना? तुम्ही ह्यांच्यामागे आलेलात बंदूक घेऊन.. न चालणारी?

कृष्णा नि रत्ना: (पाया पडत..) हमें आशीर्वाद दीजिए मांजी..

अप्पा: खबरदार कार्टे! हमें मुंह दिखाने के काबिल नहीं छोडा इसने!

भागिरथी: तुम्ही थांबा हो! मला मुंह देखू द्या जरा. वा! मेरी बहू हूबहू माधुरी दीक्षित या तब्बू.. नहीं तो ज्युलिया!

अप्पा: ही ज्युलिया कोण?

शिंदे: अँडी रा ॅबर्टसची बहीण असेल! ज्युलिया रा ॅबर्टस!

अप्पा: ह्या तिघींत नि माझ्या मनीत काय साम्य दिसतंय?

भागिरथी: नसेल! पण माझी बहू हूबहू हेमामालिनी!

कृष्णा: ड्रीम गर्ल.. कहीं तो मिलेगी कभी तो मिलेगी.. आज नहीं तो कल!

शिंदे: मिलेगी कशाला? मिळालीच! इथेच! शोधायची कशाला? बगलमें छोरा और गांवमें डिंडोरा! हो की नाही अप्पासाहेब!

अप्पा: छोरा नव्हे छोरी! माझ्या छोरीमागे पोरांची रांग उभी राहिल! पण इन्स्पेक्टर.. तुम्ही तर नाव जयसिंग शिंदे म्हणालात.. आता विजय सिंग?

शिंदे: वेल! इट्स अ लाँग स्टोरी यू नो! बट जय अँड विजय आर द सेम.. विथ अ डिफरन्स ऑफ जस्ट अ व्ही! शेवटी जय आणि विजय मध्ये काय असणार फरक!

कृष्णा: ॲज दे आर ट्विन्स!

अप्पा: उगाच फाड फाड इंग्रजी नको. असं तर आय कॅन टा ॅक इंग्लिश आणि आय कॅन वॉक इंग्लिश! पण तुम्ही खरंच तेच ना?

शिंदे: हमारी असलियत पर शक करने वाले.. तेरा मुंह काला!

अप्पा: काला तर काला! इथे कोणाला ते ब्युटी कॉंटेस्टीत उभं राहायचंय?

रत्ना: आणि अप्पा, ब्लॅक इज ब्युटिफुल!

अप्पा: पाहिलंत माझी मनी कशी हुशार आहे! आणि आपल्याला नाही चिंता कशाची! प्रत्यक्ष यमदेव जरी रेड्यावर बसून आला का नाही.. तरी आम्ही थाट्टात उभं राहणारे! म्हणू.. इथे परवानगी शिवाय रेडा पार्किंग करु नये! पण ही जय विजयची बनवाबनवी..

शिंदे: त्यापेक्षा तुम्ही हा गुंता सोडवा. नांदा सौख्य भरे.. देऊन टाका आशीर्वाद! हाय काय अन नाय काय!

अप्पा: तुझं काय जातंय बोलायला? अगदी आयोडेक्स, अमृतांजन नि झालंच तर बरनाॅल लावत तळहातावरच्या फोडासारखी जपलीय हिला.. आता बालिग झाली म्हणून काय ह्या बोक्याबरोबर..

रत्ना: बेडूक अप्पा.. (भागिरथीकडे लक्ष जाताच चपापून गप्प होते)

भागिरथी: काय हो बंदूकवाले.. उगाच रोब झाडणारे रोबो.. असं काय कमी आहे माझ्या कृष्णात? उगाच.. बरनाॅल नि आयोडेक्स आम्ही आयुष्यभर लावत राहू तुमच्या फोडाला.. फोडीला. उगाच काळजी नसावी..

शिंदे: आणि कायद्याने सज्ञान मुलीला..

अप्पा: तू तर जयविजया बोलूच नकोस.. हा आमचा अंतर्गत मामला.. चल पोरी घरी चल..

रत्ना: अप्पा.. माझा बेडूक..

अप्पा: जाईल टुणटुण उड्या मारत..

कृष्णा: बसंती.. इन अप्पाकी बात मत सुनना बसंती.. हे भगवान! मैंने सिर्फ फायनल एक्झाम पास करने के लिए दो मार्क एक्स्ट्रा मांगे थे आजतक.. उसकी भी ॲक्च्युअल नौबत नहीं आई.. लेकिन आज मांग रहा हूं.. इस रत्ना का हाथ..जिसके तळहातपर फोड आए हैं..

अप्पा: गलत.. तळहातावरचा फोड माझा! त्याला जपलं मी! आणि तू कालचा पोर..

भागिरथी: कालचा? चांगला सव्वीस वर्षांपूर्वीचा पोर आहे तो!

अप्पा: असेल! आणि माझी पोर कायदेशीर सज्ञान असेल पण बेकायदेशीर अज्ञान आहे! कायद्याला काय कळतेय? कायदा नाहीतरी गाढव असतो.

शिंदे: अप्पासाहेब.. गाढवाचं सोडा! तुमचे वाघ वेगळे.. पेंढा भरलेले..

अप्पा: तुम्ही तर बोलूच नका! शीशे के घर में रहनेवाले दूसरोंपर पत्थर नहीं फेंका करते!

रत्ना: और कपडे बदलने दूसरोंके घर में जाते हैं?

अप्पा: ठीक आहे. आपण नंतर पाहू. आता घरी चल.. माझ्याबरोबर..

रत्ना: पण अप्पा.. मला कपडे बदलायचे नाहीएत..

भागिरथी: मी काय म्हणते अप्पासाहेब, तुम्ही मोठे, तुमचा मान मोठा. मोठ्या मनाने आपण तारीख पक्की करूनच टाकू!

अप्पा: बघू नंतर..

कृष्णा: नाही अप्पासाहेब नाही. उगाच तारीख पे तारीख.. तारीख पे तारीख कशाला?

अप्पा: ठीक आहे.. आम्ही चाललोच..

(रागारागाने निघून जातात..)

भागिरथी: रत्ना, थांबव त्यांना .. डोक्यात असा राग घालून चालले..

रत्ना: त्यांची काळजी नको! मी ओळखते त्यांना. डायरेक्ट होकार द्यायचा नसेल तर ते निघून जातील. नाही म्हणायचे असेल तर आतापर्यंत ओढत नेलं असतं मला..

कृष्णा: म्हणजे? त्यांचा होकार आहे म्हणतेस?

रत्ना: तसंच समज!

कृष्णा: सगळी ह्या जयसिंगाची कृपा!

भागिरथी: जयसिंग? की विजयसिंग? तुझा जुळा भाऊ कुठून आला अचानक?

शिंदे: काय करणार काकू. अचानक जुडवा पैदा करना पडा! पण तसे जुळे एका मागोमाग एक करत जन्माला येतात!

कृष्णा: अप्पासाहेबांची बंदूक पाहून मी ह्याला बोलावले. म्हटलं अशा वेळी नाही तर कधी कामी येणार मेरे दोस्त तेरी ॲक्टिंग! नाटक में काम करने का एक ही तो है फायदा!

रत्ना: खरंय!

शिंदे: काय खरंय? तू नुसता मेसेज पाठवून दिलास. पंधरा मिनिटात ये म्हणे. तालीम नाही, डायलॉग नाही. तरी बरं साऱ्या सिच्युएशनची माहिती होती मला. इकडे माझी तारांबळ उडली.. तुमचं होईल ताराबलं चंद्रबलं.. माझी नुसतीच तारांबळं.. घाईघाईत चढवले पोलिसाचे कपडे नि आलो.. ऐनवेळी डायलॉग कसले सुचताहेत.. म्हणून टाकलं, अपने आप को कानून के हवाले कर दो!

रत्ना: पण काही म्हण, इन्स्पेक्टर म्हणून शोभतोस..

भागिरथी: म्हणून मला सांगताय.. अचानक कुंभमेळ्यात हरवलेला भाऊ सापडला?

शिंदे: जाऊ द्या काकू.. युद्धात नि प्रेमात सारंच माफ.. युद्ध अप्पासाहेबांशी नि प्रेम.. ते सांगायला हवं का रत्ना..

रत्ना: जयसिंग.. नव्हे विजयसिंग.. तू पण ना..

भागिरथी: तर आहे हे असं आहे! पुढे मागे रत्ना वाघमारे रत्ना डांगे होईलच..

कृष्णा: म्हटलं ना मी.. जो बोलता हूं वह मैं करताही हूं..

शिंदे: और जो नहीं बोलता वो दूसरेसे करवाता है! आहे हे असं आहे! मी निघतो.

शिंदे निघून जातो.

कृष्णा: आहे हे असं आहे? नाही ना!

खरं तर आहे हे असं होणार नव्हतं म्हणून तर सारी तिकडमबाजी.. त्यामुळेच आता आहे हे असं आहे म्हणता येतंय! अप्पांचं काय चुकलं का? नाहीच. पोरीची काळजी बापाच्या तोंडून बाहेर नाही कशी पडणार! पण त्यांना ही कळलं असावं.. आहे हे असं आहे! वाहत्या नदीचा प्रवाह बदलणे? नाहीच शक्य! तेव्हा आहे हे असंच आहे म्हणावं नि शांत रहावं..

डॉन बोका उडी मारत आत शिरतो. कृष्णाच्या पायाशी घुटमळतो..

कृष्णा: अरे वा! डॉन, तू आलास? भेटली का तुझी गर्लफ्रेंड?

रत्ना: गर्लफ्रेंड?

कृष्णा: अर्थात. ती गोरीपान मांजर.. छतपर मिलते हैं चोरीचोरी!

डॉन: हुं.. आहे हे असं आहे!

भागिरथी: बाई बाई.. पहा बोलला बोका!

रत्ना: हो का?

कृष्णा: असेल वा नसेल! पण खरंय की नाही! आहे हे असंच आहे!

रत्ना: तर मंडळी भेटू पुन्हा.. तोवर आहे हे असं आहे हेच खरं!

भागिरथीबाई स्वयंपाकघरात जातात. त्यांच्या मागोमाग रत्ना ही जाते. कृष्णा परत आरामखुर्चीत बसतो.

एकाएकी अप्पासाहेब आत शिरतात.. बंदूक बाजूला टाकून देतात.

अप्पासाहेब: दचकलात!

म्हटलं डॅम इट!

आम्ही परत कां आलोय?

आहे हे असं आहे हे समजून चुकलोय मंडळी. नाइलाज को क्या इलाज? पण ते सांगायला आलोय?

नाहीच!

च्यामारी आम्ही असे, रांगडे गडी. हळू आणि हळुवार बोलायला जमलं असतं तर?

यूं होता तो क्या होता!

तुम्हाला म्हणून सांगतो..

कुठे बोलू नका.

त्या भागिरथीबाईंना पाहिलं नि तुझको देखा तो ये जाना सनम.. गाणंच वाजलं डोक्यात. लहानपणची ओळख. ओळख कसली, मैत्री! ती विसरली असेल आता. ती आमच्याच गावची. तेव्हा आवडायची. लहान होती माझ्याहून. पुढे ती इकडे तिच्या संसारात. आम्ही आमच्या गावी. आता ती पुन्हा अशी भेटावी?

विचार करा..

असं झालं तर कसं होईल?

एकाच मंडपात दोन विवाह..

एक वधू आणि वर.. आणि त्याचवेळी वधूपिता आणि वरमाय! आमचे येथे श्रीकृपेकरून चि.सौ. कां रत्ना आणि चि. कृष्णा यांचा आणि अप्पासाहेब आणि भागिरथी यांचाही विवाह! कार्य सिद्धीस नेण्यास श्री समर्थ आहेतच!

सर्वांच्या अंगावर अक्षता पडताहेत एकाच वेळी! पण जनरीतीप्रमाणे हे व्हावे कसं? असं झालं तर मनीची सासू तिची सावत्र आई नि कृष्णाची आई त्याचीच सावत्र सासू होईल!

आता 'यूं होता तो क्या होता' म्हणण्यात काय अर्थ आहे?

आहे हे असं नाही.. नि असं होणार ही नाही.. ठाऊक आहे आम्हाला. फक्त एक विचार म्हणून..

आत्याबाईला मिशा असत्या तर काका म्हटलं असतं!

यूं होता तो क्या होता!

ते होणे नाही..

त्यामुळे सध्या एकच..

आहे हे असं आहे!

डॉ. नितीन मोरे

यांची

६०+२(ऑडिओ)

प्रकाशित पुस्तके










डॉ. नितीन मोरे
२ अंकी बालनाट्य

लाडेबा
डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे
INSTANT
कालिदास

मिशन
ब्रा
डॉ.नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे
तेवढं सोडून बोला
एकपात्री नाटक


डॉ. नितीन मोरे
तिसऱ्या घोलाच्या गंमती


डॉ. नितीन मोरे
खेळ आकड्यांचे


एका डॉक्टरची कोविडकथा


डॉ. नितीन मोरे
न केलेली भाषणे
बोलतो तर बोलाल की बोलतो

चक्रमादित्य भाग १ ते ५







डॉ. नितीन मोरे
मुघले ते शोले
Version 2.0.2.0



डॉ. नितीन मोरे
HOSTEL-I


डॉ. नितीन मोरे
शाणपट्टी

डॉ. नितीन मोरे
एका नाटकाची गोष्ट!


डॉ. नितीन मोरे
ऐसाही होता है

डॉ. नितीन मोरे
आणि

डॉ. नितीन मोरे

डॉ. नितीन मोरे
व्यक्ती आणि कथा ४


डॉ. नितीन मोरे
म.आ.हबा (प्रेम)कविता

डॉ. नितीन मोरे
वाळूतील पेढा


राणा दरबारी


डॉ. नितीन मोरे
अहम् ब्रह्मास्मि

डॉ. नितीन मोरे
नाथ जमूरेनाथ

आधुनिक कहाण्या

डॉ. नितीन मोरे
प्रिय पत्नी,

डॉ. नितीन मोरे
भ्र
भ्रष्टाचार


डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे
घरात


डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे
एकपात्री नाकाबंदी
सांगतो
ऐक

डॉ. नितीन मोरे
केल्याने


डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे
अ..अ..म..


डॉ. नितीन मोरे
कविता

डॉ. नितीन मोरे
मी मेल्याबिया बोलते
अभिवाचक : अंजना लगस (8208834250)
कानगोष्टी


डॉ. नितीन मोरे
मी मेल्याबिया बोलते

अंजनाई
डॉ. नितीन मोरे
मी मेल्याबिया बोलते
अभिवाचक व लेखन : अंजना लगस

डॉ. नितीन मोरे
'इका' गाईच्या कविता


डॉ. नितीन मोरे
रोमिओची परी कथा


डॉ. नितीन मोरे
ऐसे अक्षरे

जॅक्सन...
Jackson!

सुलट उलट
डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे
ऑर्वेलच्या फार्मात!

ई साहित्य प्रतिष्ठानचे हे अठरावे वर्ष
डॉ. नितीन मोरे यांचे हे एकसष्टावे पुस्तक.

डॉ. नितीन मोरे यांचे मनःपूर्वक अभिनंदन. डॉ. नितीन मोरे एक यशस्वी श्वसनरोगतज्ञ आहेत आणि एक उत्साही लेखकही. त्यांच्या लेखनात एक टवटवी असते. ते बालसाहित्यही लिहितात आणि तरुणांसाठीही. गंभीरही लिहितात आणि विनोदीही. त्यांचा विनोद कोणाच्या व्यंगावर आधारित नसतो, स्तर सोडत नाही. समाजातील अनिष्ट विसंगतीवर ते आपल्या विनोदातून नेमकं बोट ठेवतात. समझदार वाचकांना त्यांचा इशारा काफ़ी असतो. त्यामुळे त्यांच्या नर्म विनोदाचा एक फ़ॅनवर्ग निर्माण झाला आहे. ते फ़क्त विनोदी साहित्य नव्हे तर निरनिराळ्या प्रकारचे लेखन लिहीतात. त्यांनी गेली अनेक वर्षे आपले लेखन निरंतर चालू ठेवले आहे. त्यांना प्रकाशक मिळायला तोटा नाही. पण त्यांना आपली पुस्तके जास्तीत जास्त लोकांपर्यंत नेणारे आणि प्रकाशनप्रक्रिया सुलभ असणारे प्रकाशन हवे होते. त्यांनी ई साहित्यची निवड केली.

डॉ. नितीन मोरे यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्य-च्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले (९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर (९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद (१५), अविनाश नगरकर (४), डॉ. स्मिता दामले (९), **डॉ. नितीन मोरे (६१ पुस्तके)**, अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा (३), मधुकर सोनावणे (१२), अनंत पावसकर (२३), मधू शिरगांवकर (८), **अशोक कोठारे (१०००० पानी महाभारत)**, **श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ)**, मोहन

मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७), उल्हास हरी जोशी (९), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (१२), **डॉ. वृषाली जोशी- जागतिक वाङ्मय अनुवाद (६१ पुस्तके)**, डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी (७), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे (४०), आनंद देशपांडे (३), डॉ. नीलिमा कुलकर्णी (५), अनामिका बोरकर (३), अरुण फडके (६), स्वाती पाचपांडे (२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे (५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट (५), अरुण कुळकर्णी (१५), जगदिश खांदेवाले (६), पंकज कोटलवार (६), डॉ. सुरुची नाईक (३), डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे (१४), **श्याम कुलकर्णी -मूळ वाल्मिकी रामायण(३०)**, किशोर कुलकर्णी, रामदास खरे (६), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक (५), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर (३), बंकटलाल जाजू (८), प्रवीण ना दवणे, आर्या जोशी, **डॉ. सरोज सहस्रबुद्धे- वैद्यक विज्ञान(१६),** अरविंद बुधकर (४), जयश्री पटवर्धन (७), श्रीरंग कौलगी (५), यशवंत कदम(११), पांडुरंग सूर्यवंशी (४), सुधीर कारखा्नीस (८), मिलिंद कपाळे, मुकुंद कर्णिक(३), श्रीराम काळे (८), शैलेश पुरोहित (४), बी बी देसाई (२), श्रीनिवास शारंगपाणी(४), रामकृष्ण बाक्रे(३), विजया टिळक, संजय टाकळगव्हाणकर(२), पांडुरंग भागवत, मिलिंद बेंबळकर, गायत्री साळवणकर(४), भारती बिर्जे डिग्गीकर(३), विकास भावे, डॉ सुनील सावंत(२), अशोक बेंडखळे(५), सुहास साने, सुवर्णा लेले, **प्राचार्य शशिकांत कर्डेकर**(१४ भूगोल विज्ञान विषयक), स्वाती वर्तक, भारती सावंत, अभिषेक ठमके, हर्षवर्धन यादव(२), दिगंबर सलगर(४), कैलास बडगुजर, **श्रीपाद काळे- समग्र ऋग्वेद(१०)**, वैभव पाटील, चारुलता काळे, अनिल शिणगारे, स्वाती वर्तक(२), प्रमोद नाईकवाडॅे, सुधीर शास्त्री, रुपेश मराठे, सुप्रिया उपाध्ये, संजीवनी कुलकर्णी, मनोहर सुरवाडे(३), श्रेणिक सारडे (६), दिलिप ठाकूर, धनंजय कुलकर्णी, मिलिंद चौधरी, जोसेफ तुस्कानो, सुभाष धारणकर, सचिन कुल्ली(३),

विश्वनाथ मानकर, अर्चना सहस्रबुद्धे असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं "ई"यें ।

दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।

esahlty@gmall.com

www.esahlty.com

9869674820 (for free books on whatsapp)